## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी
## बारामती, जि. पुणे

### तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे
(वरिष्ठ आणि कनिष्ठ)

कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखा
कला आणि वाणिज्य विद्याशाखात पदव्युत्तर शिक्षणाची सोय

❀ व्यावसायिक अभ्यासक्रम ❀

◆ बेकरी व कन्फेक्शनरी ◆ हॉर्टिकल्चर ◆ ऑटो इंजिनिअरिंग

❀ व्होकेशनल कोर्सेस ❀

◆ मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप

❀ बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स ❀

❀ डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ ❀

❀ सर्टिफिकेट कोर्सेस ❀

◆ इलेक्ट्रिक वायरमन ◆ टु व्हिलर ऑटो मेकॅनिक

◆ कंपोझिंग, प्रिंटिंग ॲण्ड बाईंडिंग ◆ क्राफ्टसमनशिप कोर्स इन बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी

◆ सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओ सर्व्हिसिंग ◆ सर्टिफिकेट कोर्स इन टेलिव्हिजन सर्व्हिसिंग

### जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
(वरिष्ठ आणि कनिष्ठ)

कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखा
कला विद्याशाखेत पदव्युत्तर शिक्षणाची सोय

### इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च, बारामती, जि. पुणे

❀ डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंट ❀

❀ डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट ❀

❀ मास्टर्स डिग्री इन पर्सोनेल मॅनेजमेंट ❀

### औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बारामती, जि. पुणे

❀ जून १९९१ पासून सुरू करण्यात येत आहे. ❀

❀ वेल्डिंग ❀ इलेक्ट्रिशियन ❀ कारपेंटरी ❀

### विज्ञान कार्यशाळा, बारामती, जि. पुणे

### मुलांचे वसतिगृह, बारामती, जि. पुणे

### अनेकान्त मुद्रणालय, बारामती, जि. पुणे

मुद्रण :- प्रिन्ट ॐ ऑफसेट सातारा फोन ३१९८

30 वा अंक

# अनेकान्त

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

## वार्षिक नियतकालिक १९९१-९२

हार्दिक शुभेच्छा

• सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची •

**रुपी को-ऑप. बँक लि.**

**(शेड्यूल्ड बँक)**
मुख्य कचेरी - २०६२, सदाशिव पेठ,
विजयानगर कॉलनी, पुणे ४११ ०३०

आपला हात जगन्नाथ
कर्तृत्वाच्या जोरावर जग जिंकतो सिकंदर
असतील दोन समर्थ हात
तर दैवही देते उत्तम साथ
तुमच्या हाती सगळे काही, संपन्न भविष्याची ग्वाही
तुम्हीच कमवा, तुम्हीच जमवा, रुपीच्या ओंजळीत ठेवा
जमविलेले सांभाळणे, सांभाळून वाढविणे
परस्परांच्या विश्वासावर उंच उंच झेप घेणे
यासाठीच तुम्ही आम्ही एकत्र यायचे !

श. का. पत्की
सरव्यवस्थापक

खु. र. छाजेड
उपाध्यक्ष

ॲड. ग. हे. देव
अध्यक्ष

With Best Compliments From

**Baramati Grape Industries Ltd.,**

Pimpali, Tal. Baramati, Dist. Pune
Phone 2240

**Manufacturer of High Quality Grape spirit, Wines & other IMFL products.**

**Board of Directors**
Dr. C. Rossi, Chairman

Mr. D. G. Pawar
Mr. S. D. Lalla
Mr. J. J. Khambata
Mr. S. S. hiremath
Mr. H. G. Deshpande
Mr. T. G. Gawade
Mr. P. N. Jachak

Mr. R. B. Gholap
Mr. S. S. Gandhi
Mr. P. G. pawar
Col. SPS Khurana
Mr. S. N. Chavan
Mr. N. S. Ghorpade
Mr. V. T. Kokare

Mr. Y. D. Acidwalla, General Manager.

अनेकांन्त एज्युकेशन सोसायटीचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

अनन्तधर्मणस्तत्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक

**अंक तिसावा - १९९१-९२**

"न धर्मो धार्मिकैर्विना"
"ज्ञानेन पुंसा सकतार्थ सिद्धी:
'उन्नतं मानसं यस्य भाग्यं तस्य
समुन्नतम्"

- आचार्य गुरुदेव श्री समन्तभद्र महाराज

**संपादक मंडळ**

* अध्यक्ष
प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

* सहाय्यक
उपप्राचार्य एस्. आर्. नवाथे
उपप्राचार्य डॉ. के. एम्. सुर्वे
प्रा. एन्. जी. लोंढे
प्रा. के. एस्. अय्यर
प्रा. पी. बी. घेरे
प्रा. बी. जी. देशमुख
प्रा. व्ही. बी. परकाळे
प्रा. ए. बी. भगाटे
प्रा. कु. आर्. के. सुर्वे

**प्रमुख संपादक**
प्रा. आप्पासाहेब देसाई

संगणक : प्रशांत गुजर,
टाईप इनोव्हेटर्स, मोती चौक, सातारा
मुद्रक : श्री. संदेश शहा,
प्रिंट ऑफसेट, सातारा. फोन २२६९४

प्रकाशक : प्राचार्य डॉ. जे. के. गोधा,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (पुणे)

मुखपृष्ठ : दिक्षीत ॲडव्हरटायझींग, बारामती.

# अनुक्रमणिका


१. संपादकीय ३
२. प्राचार्यांचे मनोगत ४
३. हार्दिक अभिनंदन व अभीष्टचिंतन ५
४. भावपूर्ण श्रद्धांजली ६
५. श्रद्धांजली ७
६. महाविद्यालयाचे अंतरंग ८


## मराठी विभाग


७. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा : व्यक्ति आणि कार्य/ डॉ. व. मा. कोठारी १३
८. आचार्य समंतभद्र महाराज : एक लोकोपकारी महान व्यक्तिमत्व/कु. यशश्री शहा १५
९. ज्ञानेश्वरांचे गुरुप्रेम/कु. प्रगती भापकर १८
१०. मराठी आख्यान कविता आणि मोरोपंत/कु. वर्षा देसाई २०
११. हुंडाबळी समस्या व उपाय/कु. राजश्री वाबळे २२
१२. स्त्री-पुरुष समानता हीच खरी स्त्रीमुक्ती/ एम.एम. भांडवलकर २४
१३. पतंग/सचिन पटवर्धन २५
१४. नदीचे आत्मवृत्त/बी.डी.जाधव २७
१५. इलेक्ट्रॉनिक्स युद्ध व रडार यंत्रणा/संजय आंदळकर २९


## कविता


१६. चंदन/संजय ननावरे ३०
१७. तुझे माझे/बनकर इ. बी. ३०
१८. तुटतय हृदय/कु. मंगल भोसले ३०
१९. अश्रू/कु. रंजना वाघ ३०
२०. बंद करावे डोळे की कान/विजयकुमार चव्हाण ३१
२१. दलित/राजेंद्र सोनवणे ३१
२२. स्वप्न/कु. रंजना वाघ ३१
२३. निसरगाठी/कु. मुंडलीक ए. व्ही. ३२
२४. बैल पोळा/निवृत्ती सोनवणे ३२
२५. स्वप्न/ए. जे. जाधव ३३
२६. ज्योत/अरविंद साबळे ३३
२७. वादळ/विठ्ठल देवकते ३३
२८. कवि प्रेमात पडतो तेव्हा/ज्ञानदेव बोराटे ३३
२९. मनोगत/कु. किरणमयी घायगुडे ३४
३०. घर/प्रदीप देवकाते ३४
३१. अशी ही रात्र/प्रसाद वैद्य ३४
३२. पाणी/सुधीरकुमार घोडके ३४
३३. आकांक्षा/मनीषा सूळ २८
३४. वास्तव आणि आयुष्य/राजेश सोनवणे २८


## हिंदी विभाग


३३. एक संवेदनशील व्यक्तिमत्व : महादेवी वर्मा बनकर इ. बी. ३५
३४. इन्सान तो वही है/मनिषा किकळे ३७
३५. जानवर/बनकर इ. बी. ३७
३६. जिंदगी/खोमणे डी. आर्. ३८


## इंग्रजी विभाग


37. Students and Politics/Ajinath Ghorpade 39
38. Books : Our True Friends/Miss Deepa Doshi 41
39. Art of Characterisation in chaucer's General Prologue to Canterbury Tales/Anil Jagtap 42
40. Five Laws of Library Science/B. D. Khore 45
41. Mathematics/Miss Manisha Misal 40
42. Memorable Star/Miss Deeparaje Jadhavrao 40
43. In Between the Stones/Miss Deepa Doshi 40
44. Ego/Miss Arti Kulkarni 40
45. When the Heart is Full/Miss A. M. Makhare 46
46. Time/Miss Gauri Nandanikar 44
47. Tears/Miss Kadam S. V. 44

४८. विविध विभागांचे अहवाल ४७ ते ५६




# संपादकीय

महाविद्यालय व परिसराच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक संवेदनाशीलतेचा सूक्ष्म शोध घेणारा, नाविण्यपूर्ण 'अनेकांत' चा तिसावा अंक आपल्या हाती देताना आम्हा संपादक मंडळात कर्तव्यपूर्तीचा व कार्यसिद्धीचा अत्यंत आनंद होत आहे.

बारामती सारख्या ग्रामीण परंतु विकसनशील, संवेदनाशील परिसरांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाच्या स्पंदनांचा, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या महाविद्यालयीन उपक्रमांचा, परिसरातील समाजाच्या सुख दुःखामध्ये आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये महाविद्यालयाने घेतलेल्या सहभागाचा आणि केलेल्या सहकार्याचा, महाविद्यालयाने व परिसराने निर्माण केलेल्या आदर्शांचा परिचय आणि विद्यार्थ्यांच्या लेखनाला एक प्रभावी व परिणामकारक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अनेकांतची वैशिष्ट्यपूर्ण रचना करण्यात आली आहे.

बारामतीचा हा ग्रामीण परिसर भारताचे संरक्षणमंत्री मा. ना. शरदचंद्रजी पवार यांच्या कर्तृत्वाने व प्रेरणेने आज द्रूतगतीने विकसीत रुप धारण करीत आहे. परिसरांच्या विकासाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातील वाढत्या गरजा, अपेक्षा लक्षात घेऊन त्यासाठी सर्व प्रकारच्या अद्यावत सुविधा ग्रामीण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊन आमच्या महाविद्यालयाने संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामीण भागातील एक अग्रेसर महाविद्यालय म्हणून नावलौकिक संपादन केलेला आहे. परमपूज्य आचार्य गुरुदेव १०८ श्री. समन्तभद्र महाराजांच्या आशीर्वादाने स्थापन झालेल्या या महाविद्यालयाचा परिचय करून देण्याचा हा सुयोग त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात जुळून आला आहे.

१९६२ ते १९९२ या 'त्रिदशक' काळात महाविद्यालय स्वयंस्फूर्ती व स्वसामर्थ्याने पूर्णत्व संपादन करीत आहे. विकसित होत असलेल्या परिसरातील विविध आव्हानांशी सामना करून महाविद्यालयाने आपली यशस्वी वाटचाल गतिमान ठेवलेली आहे.

ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने व सहकाऱ्यांच्या मदतीने मानाचे स्थान पटकावले त्यांचे अभिनंदन करून आणि दुर्दैवाने ज्यांच्या कर्तृत्वाला व नेतृत्वाला आपण कायमचे पारखे झालो अशा दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली अर्पित करून महाविद्यालयाने परिसराशी असलेल्या आपुलकीची व सहृदयतेची अभिव्यक्तीच केली आहे.

ज्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या हेतूने प्रकाशित होत असलेल्या 'अनेकांत' ला अलिकडे विद्यार्थ्यांचा हवा तेवढा प्रतिसाद मिळत नही ही खेदाची बाब आहे. अनेकवेळा आवाहने करूनही आपल्या साहित्यकृती निर्माण करून प्रकाशनासाठी देण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्यातील ही उदासीनता शिक्षणक्षेत्राशी इतर सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्राचा संबंध दुबळा होत असल्याची सूचना आहे, याची वाचकांना जाणीव व्हावी.

महाविद्यालयाचे कर्तृत्ववान प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचा यावर्षी महाराष्ट्र शासनाचे 'आदर्श' शिक्षक राज्य पुरस्काराने' गौरव केला. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, सर्वस्पर्शी, दीर्घदृष्टीचे यशवंत व नीती चतुर नेते मा. शरदचंद्रजी पवार हे भारताचे संरक्षणमंत्री झाले आहेत, शिवाय बारामती ग्रामीण परिसर झपाट्याने विकसित होत आहे या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाच्या कार्याचे आकलन व मूल्यमापन करून विद्यार्थी शिक्षण आणि महाविद्यालय यांच्यातील सुसंगतीसाठी आपण प्रत्येकानेच कोणता वाटा उचलावा याची वाचकांना प्रकर्षाने जाणीव व्हावी आणि अनेकांतच्या स्वरुपात आपल्या समोर मांडलेले महाविद्यालय व परिसराचे प्रतिबिंब उत्तरोत्तर अधिक आकर्षक व परिणामकारक कसे होईल याची प्रेरणा जागृत होऊन प्रत्येकाने आपला यातील सहभाग वाढविण्यासाठी प्रवृत्त व्हावे अशा आशयाची बांधणी 'अनेकांत' मध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

या अंकाला मूर्तस्वरुप देण्यात अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले. विशेषतः आमच्या महाविद्यालयाचे प्रेरणादायी प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, दिलेल्या प्रेरणा या नियतकालिकाच्या निर्मिती मागील मुख्य आधारस्तंभ आहेत. उपप्राचार्य प्रा. एस्. आर्. नवाथे, प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे, प्रा. नी. गं. लोंढे, प्रा. के. एस्. अय्यर, प्रा. आर्. जी. पाटील. प्रा. बी. व्ही. झगडे, इतर सहकारी प्राध्यापक, ऑफिस स्टाफ, नियतकालिकासाठी साहित्य देणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी या सर्वांच्या सहकार्यामुळेच हा अंक निघू शकला.

साताऱच्या प्रिंट ओम ऑफसेट मुद्रणालयाचे मालक संदेश शहा व त्यांचे सहकारी यांनी अंकाची छपाई अल्पावधीत व उत्कृष्टरीत्या करून दिल्याबद्दल तसेच श्री. दीक्षित यांनी आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल या अंकाच्या सौंदर्यात भर पडली आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

प्रा. आप्पासाहेब देसाई
संपादक.

## ।।।प्राचार्यांचे मनोगत।।।

शैक्षणिक वातावरण, सामाजिक परिवर्तन आणि देशाची प्रगती यांचा अन्योन्य संबंध आहे. कोणत्याही प्रवृत्तीने विकृतीकडे जाणाऱ्या सामाजिक परिस्थितीला विद्येशिवाय कोणतीही शक्ती सुसंस्कृत वळण देऊ शकत नाही. आजच्या सामाजिक स्थिती-गतीचा विचार केला तर आजचे शैक्षणिक वातावरण बदलले पाहिजे याची तीव्रतेने जाणीव होते. समाजाची धारणक्षमता वाढवणारे, राष्ट्राच्या प्रगतीला पोषक ठरणारे, व्यक्ती-व्यक्तींमधील सर्वांगीण संबंधांना मजबूत करून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या सर्वोच्च सामाजिक मूल्यांची उक्तीकृतीतून आणि आचार-विचारांतून प्रस्थापना करणारे आणि त्यातून प्रत्येक व्यक्तीला देशाचा समर्थ नागरिक बनवणारे शैक्षणिक वातावरण निर्माण झाले पाहिजे.

राष्ट्राच्या उभारणीत आणि विकासात महत्वाचा वाटा उचलणारा ग्रामीण भाग आज सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणातील प्रदूषणामुळे अत्यंत भयग्रस्त झालेला आहे. लूट, खून, मारामाऱ्या, दरोडे, हुंडाबळी, स्त्रियांवरील बलात्कार, लाचलुचपत, अडवणूक, फसवणूक, प्रचंड भाववाढ, जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, नाजुक आर्थिक परिस्थिती, सुशिक्षित बेकारी, शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांमधील उदासीनता, त्यांची वर्गातील अनुपस्थिती, त्यांच्या वृत्तीतील वाढती बेफिकिरी इत्यादी नैसर्गिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्नांनी उग्र रुप धारण केलेले असल्यामुळे येथील संपूर्ण समाज दिशाहीन अंधाऱ्या वाटेवरून आपली वाटचाल करीत आहे. त्याला आदर्शांची समज आहे, नीतीची उमज आहे, मात्र त्यासाठी प्रकाशाची गरज आहे. विद्या प्रकाश आहे, ज्ञान दिशा आहे, संशोधनाची आशाही आहे. म्हणूनच ज्ञानप्राप्तीची त्यांना अपेक्षा आहे.

समाजाच्या दुष्ट प्रवृत्तींशी आपणाला यशस्वी मुकाबला करावयाचा आहे. 'एकाने एकास शिकवावे' या उक्तीतून शिक्षित - अशिक्षितांमधील दरी कमी करून त्यांच्यामध्ये सहृदयता, सहिष्णूता, साहचर्याची भावना आणि मजबूत ऋणानुबंध निर्माण करावयाचे आहेत. प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून शंभर टक्के साक्षरता प्रस्थापित करावयाची आहे. त्यातून त्यांच्यामध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करून देशाच्या प्रगतीची आणि प्रगतीला आड येणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींना नष्ट करण्याची सर्व आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य निर्माण करावयाचे आहे. शिक्षणाला समाजाभिमुख बनवून घसरणाऱ्या, नैसर्गिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक वातावरणाचे आपण सर्वांनीच दीपस्तंभ व आधारस्तंभ बनावयाचे आहे.

देशाचा दीपस्तंभ आणि आधारस्तंभ विद्यार्थी अवस्थेतून आणि महाविद्यालयीन माध्यमातून घडत असतो. त्याला सर्वांगाने पूर्णत्व प्राप्त होण्यासाठी महाविद्यालयीन अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर उपक्रमांमध्येही उत्स्फूर्त सहभाग घेऊन स्वतःचा आणि व्यक्तित्वाचा विकास करून घ्यावयाचा असतो. महाविद्यालयातून राबवल्या जाणाऱ्या कला, क्रीडा, विविध सेवा योजना, विविध विकास योजना, विविध मंडळे, स्पर्धा परीक्षा इत्यादी उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आदर्श जीवनाला आवश्यक असणाऱ्या संस्कारांनी संस्कारित व्हायचे असते. आज सर्वच समाजाची व्यवहारिक अभिरुची पूर्णपणे सांपत्तिक सुखाकडे झुकलेली आहे. त्यामुळे मनाला आनंद मिळवून देणाऱ्या कलांकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होत असताना दिसते. त्यामुळे त्यांच्याकडून ग्रंथवाचनाची हेळसांड होताना दिसते आणि सहज उपलब्ध झालेल्या ग्रंथालयाचा ते उपयोग करून घेताना दिसत नाहीत ही बाब चिंतनीय आहे.

शासनाने विद्यार्थी, महाविद्यालये आणि परिसर यांना अनुलक्षून आपले शैक्षणिक धोरण आखले पाहिजे. कालमान परिस्थितीनुसार समाजाच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक अभ्यासक्रम आखले पाहिजेत. ज्या ठिकाणी शिक्षणानुकूल साधनसामुग्री आणि वातावरण उपलब्ध नाही अशा ठिकाणी आणि विना अनुदान तत्वावर महाविद्यालये उभारावयास परवानगी दिल्यामुळे फक्त महाविद्यालयांच्या संख्येत वाढ झालेली आहे. शासनाने उच्च शिक्षणाकडील लक्ष कमी करून प्राथमिक शिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित केले आहे. हे धोरण तितकेसे बरोबर वाटत नाही. एखादी विद्याशाखा, विषय, कोर्स सुरु करण्यास शासन विना अनुदान तत्वावर मान्यता देते ही बाब समाजाच्या दृष्टीने घातक आहे. आज उच्च शिक्षणाची होत असलेली अशा पद्धतीची अक्षम्य हेळसांड यामुळे तज्ञ प्राध्यापक मिळत नाहीत किंवा विद्वान लोक या क्षेत्राकडे आकर्षित होत नाहीत. उच्च शिक्षण आज अत्यंत खर्चिक झालेले असून विद्यार्थ्यांच्या फी मध्ये वाढ करणे गरजेचे आहे. फी मध्ये वाढ केल्याशिवाय विद्यार्थ्यांना शिक्षणाचे मूल्यही समजणार नाही आणि त्याशिवाय पर्यायही राहिलेला नाही. यावर शासनाने लवकर निर्णय घेणे जरुरीची आहे.

**डॉ. जे. के. गोधा**
प्राचार्य

## हार्दिक अभिनंदन व अभीष्ट चिंतन

### नियुक्ती

| | |
|---|---|
| मा.ना.पी.व्ही.नरसिंहराव | भारताचे पंतप्रधान |
| मा.ना.शिवराज पाटील | लोकसभा सभापती, |
| मा.ना.सुधाकरराव नाईक | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| मा.ना.बापूसाहेब थिटे | गृह राज्यमंत्री |
| मा.ना.मदन बाफना | अर्थ राज्यमंत्री |
| मा.ना.शाम अष्टेकर | क्रीडा युवक कल्याण राज्यमंत्री |

या सर्वांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

### निवड

| | |
|---|---|
| डॉ. श्रीधर गुप्ते | कुलगुरू पुणे विद्यापीठ, (फेरनिवड) |
| डॉ. विठ्ठलराव घुगे | कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ, |
| डॉ. मोहनराव हापसे | प्रकुलगुरू, पुणे विद्यापीठ, (फेरनिवड) |
| डॉ. प्राचार्य शिवाजीराव कदम | कार्यकारणी परिषद सदस्य व अधिष्ठाता, पुणे विद्यापीठ. |
| प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | कार्यकारणी परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ. |
| श्री. रमेश मंत्री | अध्यक्ष, मराठी साहित्य संमेलन |

निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

### अभीष्टचिंतन

| | |
|---|---|
| प्रा. दि. ब. देवधर | जीवनाची 'शतकपूर्ती' |
| श्री. शंकरराव दाते | 'अमृत महोत्सव' |
| श्री. आमगोंडा आ. पाटील | 'षष्ठ्यब्दिपूर्ती' |

निमित्त अभीष्टचिंतन व शुभेच्छा

### पुरस्कार प्रदान :

| | |
|---|---|
| श्री. आण्णासाहेब हजारे | 'पद्मभूषण' |
| तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | 'पद्मभूषण' |
| श्रीमान शेठ लालचंद हिराचंद | 'पद्मश्री' |
| डॉ. वि. ग. भिडे (माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ) | 'पद्मश्री' |
| प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | 'आदर्श शिक्षक' राज्य पुरस्कार |
| प्राचार्य डॉ. व्ही. के. घाटे | 'आदर्श शिक्षक' राज्य पुरस्कार |
| ना. जयवंतराव टिळक | पुणे विद्यापीठ डी. लिट् पदवी प्रदान |
| पंडित भिमसेन जोशी | पुणे विद्यापीठ डी. लिट पदवी प्रदान |
| कृषीभूषण आप्पासाहेब पवार | 'डी. लिट' पदवी प्रदान महात्मा फुले व्यासपीठ |

या सर्वांना पदवी व पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

### यशस्वी निवड

| | |
|---|---|
| श्री. सदाशिव धोंडिबा सातव | नगराध्यक्ष, बारामती |
| सौ. मृणालिनी मोतीलाल शहा | उपाध्यक्ष, बारामती |
| श्री. सतीश नामदेवराव खोमणे | सभापती, पंचायत समिती, बारामती |
| श्री. बाळासाहेब गावडे | सदस्य, जिल्हा परिषद, पुणे |
| श्री. संपतराव देवकाते | सदस्य, जिल्हा परिषद, पुणे |
| श्री. बबन थोरात | सदस्य, जिल्हा परिषद, पुणे |
| श्री. भगवानराव खारतुडे | सदस्य, पंचायत समिती, बारामती |

### अभिनंदन

| | |
|---|---|
| सौ. रश्मी नवाथे-दीक्षित (माजी विद्यार्थिनी) | पी.एच.डी. पदवी संपादन पुणे |

**या सर्वांची यशस्वी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.**

## भावपूर्ण श्रद्धांजली

सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल आम्ही तीव्र दुःख व्यक्त करून महाविद्यालयातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

आमचे महाविद्यालयाचे

माजी प्राचार्य डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांच्या मातोश्री श्रीमती काशीबाई अक्कोळे.

प्रा. आप्पासाहेब देसाई यांचे वडिल श्री. भाऊसाहेब देसाई.

प्रा. धनंजय शहा यांचे वडिल श्री. श्रीपाल शहा.

प्रा. प्रकाश रतन पाटील यांचे वडील श्री. रतन पाटील

या सर्वांचे वृध्दापकाळाने निधन झाले.

श्री. धनंजय जगताप, बारावी (सायन्स) या विद्यार्थ्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

महाविद्यालयाचे हितचिंतक -

श्री. भिकोबा तांबे, श्री. आण्णासाहेब शेंबेकर, बारामती वृद्धापकाळाने निधन झाले.

साहित्यिक -

प्रसिद्ध लेखक रा. भि. जोशी, कविवर्य वा. दा. कांत, जेष्ठ समीक्षक वा. ल. कुलकर्णी, कला समिक्षक द. ग. गोडसे, स्वामीकार रणजित देसाई, व्याकरणकार मो. दा. वाळिंबे.

संगीत -

थोर गायक पंडित कुमार गंधर्व.

वृत्तपत्र व उद्योग -

इंडियन एक्स्प्रेसचे संस्थापक-अध्यक्ष रामनाथ गोएंका, उद्योगपती श्री. श्रेयांसप्रसाद जैन, मराठवाडा दैनिकाचे मानद संपादक अनंतराव भालेराव.

या सर्वांना आमची विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.

गुरुकुल शिक्षण प्रणालीचे पुनरुद्धारक

परमपूज्य आचार्य गुरुदेव १०८ श्री समन्तभद्र महाराज

(शताब्दि महोत्सवी वर्ष दि. २४.१२.१९९१ ते २३.१२.१९९२)



नमः समन्तभद्राय गुरुदेवाय स्वामिने । समन्तानां सुभद्राय ज्ञानिने कर्मयोगिने ॥

जन्म - मार्गशीर्ष वद्य ४,
दि. १९ डिसेंबर १८९१

समाधिमरण - श्रावण शुद्ध ५
दि. १८ ऑगस्ट १९८८

# श्रद्धांजली

## युवा नेता माजी पंतप्रधान

# स्वर्गीय राजीवजी गांधी



अखंड भारत उभा राहण्या, एकजुटीचा मार्ग धरा ।
राजीवजींच्या कर्तृत्वाचा, युवक दिसू दे घराघरा ॥

दि. ३१ मे १९९१ च्या काळरात्रीने भारतमातेचे थोर आणि लाडके सुपुत्र राजीवजी गांधी यांचेवर कठोर घाला घातल. स्वर्गीय पंतप्रधान इंदिराजी गांधी यांच्याप्रमाणेच देशाच्या अखंडतेसाठी राजीवजी गांधी यांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यवेदीवर आपले अमर बलिदान केले. ते हुतात्मे झाले. आपल्या या तरुण, उमद्या व लाडक्या माजी पंतप्रधानाचे स्वप्न होते.'अखंड भारत' 'बलशाली भारत' 'विकसित व विज्ञाननिष्ठ भारत' हे स्वप्न साध्य करण्यामाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने आपली जात, धर्म, प्रांतीयता विसरुन व विज्ञानाची कास धरून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. स्वर्गीय राजीवजी गांधी यांना हीच खरी श्रद्धांजली.

आमचे स्फूर्तीस्थान

यशवंत, नीतिचतुर नेतृत्व



**मा. नामदार शरदचंद्रजी पवार**

संरक्षण मंत्री, भारत सरकार

हार्दिक अभिनंदन

हार्दिक अभिनंदन

''आदर्श शिक्षक राज्यपुरस्कार''

कुशल नेतृत्व व यशस्वी प्राचार्य



**प्राचार्य डॉ. जे. के. गोधा**

एम.कॉम.,बी.ए.,एलएल.बी.,पीएच.डी.

# हार्दिक अभिनंदन



मा. ना. अनंतराव थापटे
शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य
व पालक मंत्री, पुणे जिल्हा



मा. ना. डॉ. पतंगराव कदम
शिक्षण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. अजित पवार
कृषि व फलोत्पादन राज्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



डॉ. [illegible] गुप्त
कुलगुरु, पुणे विद्यापीठ



डॉ. मोहनराव हापसे
उपकुलगुरू, पुणे विद्यापीठ



मा. श्रीमानशेठ लालचंद हिराचंद
भारतसरकार तर्फे 'पद्मश्री' प्रदान



मा. श्री. सदाशिव धोंडिबा सातव
नगराध्यक्ष, बारामती.



मा. श्री. आमगोंडा आ. पाटील
अध्यक्ष, महावीर बँक व 'षष्ट्यब्दीपूर्ती'



संस्थापक व माजी अध्यक्ष,
स्व.सेठ फुलचंद रामचंद गांधी
अनेकांत एज्युकेशन सोसायटी



महाविद्यालयाचे उदारधी परमसंजीवक
स्व. तुळजाराम चतुरचंद शहा
(वाघोलीकर)

## भावपूर्ण श्रद्धांजली



**स्व. धोंडीबा आबाजी सातव (कारभारी)**
माजी नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद

बारामती नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष व आमच्या महाविद्यालयाचे हितचिंतक, मार्गदर्शक व आश्रयदाते मा. श्री. धोंडीबा आबाजी सातव उर्फ कारभारी (आण्णा) यांचे वयाच्या ८४ वर्षी अर्धांग वायूने दुःखद निधन झाले.

बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व नगरसेवक म्हणून सुमारे २५ वर्षे त्यांनी कारभार पाहिला होता. आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत अद्ययावत नागरी सुविधा जनतेला पुरवून बारामती ही नगरी आदर्श, सुखी, संपन्न बनविण्यात आणि एकूणच बारामतीचा कायापालट करण्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते, राजकारण, समाजकारण, धर्मकारण, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यात हिरीरीने भाग घेऊन बारामती नगरीच्या जडण-घडणीत त्यांनी महत्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या प्रेमळ, लोभस, मितभाषी व्यक्तिमत्वामुळे समाजातील सर्व थरातील लहान-थोरांशी त्यांचे आपुलकीचे संबंध होते. ज्ञानेश्वरीची पारायणे, साधु-संतांची कीर्तन-प्रवचने आयोजित करून भागवत धर्माची पताका त्यांनी सतत फडकवत ठेवली आहे.

कै. धोंडीबा आबाजी सातव उर्फ कारभारी (आण्णा) यांच्या पवित्र आत्म्यास आमची विनम्र व भावपूर्ण श्रद्धांजली.

## गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती, बारामती



मा. श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा
अध्यक्ष, गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती



मा. डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी
सचिव, गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती



मा. श्री. माणिकलाल तुळजाराम शहा
खजिनदार - गव्हर्निंग कौन्सिल
सदस्य - स्थानिक समिती



मा. श्रीमान शेठ लालचंद हिराचंद
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. श्री. विमलचंद माणिकचंद गांधी
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. प्राचार्य जी. के. पाटील
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. श्री. शिवलाल प्रेमचंद शहा
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. मोतीचंद फुलचंद शहा
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल
खजिनदार, स्थानिक समिती



मा. श्री. माणिकचंद ज. भिसीकर
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती, बारामती



मा. श्री. मोतीलाल तुळजाराम शहा
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. श्री. आमगोंडा आ. पाटील
सदस्य गव्हर्निंग कौन्सिल



मा. श्री. जयपाल भूपाल झेले
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती



प्राचार्य डॉ. आर्. टी. अक्कोळे
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. प्राचार्य डी. डी. मगदूम
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल



मा. श्री. शशिकांत शिवलाल शहा
सदस्य, गव्हर्निंग कौन्सिल (निमंत्रित)
खजिनदार, स्थानिक समिती



मा. श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. भोगीलाल गुलाबचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती

## अनेकांत एज्युकेशन सोसायटी

### गव्हर्निंग कौन्सिल व स्थानिक समिती, बारामती



मा. श्री. पवनलाल गंगाराम गांधी
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. गौतमचंद गुलाबचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. श्रीमल गुलाबचंद गुगळे
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. माणिकलाल रुपचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती



मा.श्री.माणिकलाल छगनलाल मुथा
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. विलास दीपचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. विलास माणिकचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती



मा. श्री. अरहतदास हिराचंद शहा
सदस्य, स्थानिक समिती

## उज्वल यशाचे मानकरी

(महाविद्यालयात प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक)

अ भि नं द न



व्ही. एस्. टिकोळे
एम्.कॉम्.



पल्लवी दोशी
आक्टोबर १९९१ मध्ये
उच्च माध्यमिक परीक्षेत
पुणे विभागात प्रथम क्रमांक



जी. जे. कांडेकर
बी.लिब्. सायन्स



एस्. सी. म्हेत्रे
१२ वी सायन्स



सुषमादेवी चांगण
१२ वी आर्टस्



के. ए. साळुंके
१२ वी कॉमर्स



ए. बी. हेमाडे
बी.एस्सी.



सीमा तावरे
बी.ए.



विद्या कदम
बी.कॉम्.



एन्. बी. बंडगर
बी.कॉम्.

## क्रीडांगणावर



लिना कदम
विद्यापीठ खो-खो व
विभागीय मैदानी स्पर्धा



झुबेर शेख
विद्यापीठ मैदानी स्पधा



वैशाली वेलपत्रे
आंतर-शालेय राष्ट्रीय
मैदानी स्पर्धा

## विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड - १



डी. एम्. खरात
कबड्डी



एस्. जी. सय्यद
कबड्डी



एम्. व्ही. बंडगर
कुस्ती



एस्. ई. ननवरे
मल्लखांब



एस्. एस्. जाधव
शरीर सौष्ठव व वजन
उचलणे



एस्. के. बांदल
शरीर सौष्ठव



एस्. टी. घोरपडे
शरीर सौष्ठव



एम्. जी. अनासपुरे
शरीरसौष्ठव

## विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड - २



साधना मोकाशी
कबड्डी



शमिका भावे
कबड्डी



प्रतिभा पवार
कबड्डी



सुनिता जाधव
कबड्डी



मंजुषा खोचरे
कबड्डी-खो-खो



मनीषा महामुनी
खो-खो



शुभांगी रसाळ
खो-खो



पद्मश्री उपाध्ये
खो-खो, बास्केटबॉल



वैशाली मोरे
खो-खो, मैदानी स्पर्धा



शर्मिला कुलकर्णी
खो-खो,मैदानी स्पर्धा



योगिता देशपांडे
मैदानी स्पर्धा
(जिल्हा स्तरीय)



सुचेता भापकर
मैदानी स्पर्धा



संगीता भोसले
व्हॉलीबॉल



मीना सोनगांवकर
बास्केटबॉल, मैदानी स्पर्धा



राखी गुजर
बास्केट बॉल



दिपाली कदम
बास्केटबॉल, बॅडमिंटन

## विभागीय क्रीडास्पर्धांसाठी निवड - ३


आर. पाठक
बॅडमिंटन


एस. एस. सकट
हॅण्डबॉल


एन. बी. मेहेंद्रे
हॅण्डबॉल


एच. जे. भास्कर
हॅण्डबॉल


ए. एस. कोठारी
बास्केटबॉल


एम. पी. झगडे
मैदानी स्पर्धा


ए. आर. तांबोळी
वजन उचलणे


ए. टी. नलावडे
वजन उचलणे


आंतरमहाराविद्यालयीन बॅडमिंटन (मुली) उपविजयी संघ


एस. एस. पिसाळ
जिल्हा स्तरीय मैदानी स्पर्धा

## आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा - १


कबड्डी (मुली)
विजयी संघ


खो-खो (मुली)
विजयी संघ


रिले (मुली)
विजयी संघ

## आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा - २


कबड्डी (मुले)
उपविजयी संघ


हॅण्डबॉल (मुले)
उपविजयी संघ


बास्केट बॉल (मुली)
उपविजयी संघ

## आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा - ३


वजन उचलणे व शरीरसौष्ठव (मुले)
उपविजयी संघ


मल्लखांब (मुले)
उपविजयी संघ


बुद्धीबळ (मुले)
उपविजयी संघ

# प्रासंगिक कार्यक्रम - १



मा. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचा 'आदर्श शिक्षक राज्यपुरस्कार' मिळाल्याबद्दल मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते सत्कार.



सौ. प्रमिला गोधा यांचा सत्कार

कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेची ढाल स्वीकारतांना कु. मनीषा येडुरकर. चिंतामणराव कॉमर्स कॉलेज, सांगली.

सत्कार



श्री. प्रतापराव बोर्डे
कुलपती नियुक्त कार्यकारी
परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ

प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम
सहसचिव, भारती विद्यापीठ पुणे.

# प्रासंगिक कार्यक्रम - २

गुणवत्ता पारितोषिक वितरण



मा. डॉ. श्रीधर गुप्ते, कुलगुरू पुणे विद्यापीठ यांचा सत्कार

कुलगुरु मा. डॉ. श्रीधर गुप्ते यांचे भाषण



पारितोषिक वितरण
सौ. शरयु गुप्ते यांचे हस्ते



## प्रासंगिक कार्यक्रम - ३

### साक्षरता अभियान




प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीनिवास पाटील, जिल्हाधिकारी, पुणे




व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर

### साक्षरता अभियान



मा. श्री. आर्. के. बाघ
गटविकास अधिकारी, बारामती



मा. डॉ. उत्तमराव भोईटे, अधिष्ठाता,
पुणे विद्यापीठ

### स्पर्धा परीक्षा केंद्र - उद्‌घाटन



मा. श्री. प्रभाकर देशमुख
प्रांत अधिकारी, बारामती

मा. श्री. भगवंतराव मोरे,
पुणे जिल्हा (ग्रामीण) पोलिस अधिक्षक

## प्रासंगिक कार्यक्रम - ४

### चर्चासत्र : डॉ. आंबेडकर - ''राजकीय विचार व नेतृत्व''



उद्‌घाटन : प्रमुख पाहुणे: मा. श्री. बाळासाहेब भारदे, माजी सभापती, महाराष्ट्र विधानसभा



समारोप : मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले, माजी कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ.



रक्तदान कार्यक्रम (२६ जानेवारी १९९२)

### विज्ञान व वाणिज्य प्रदर्शन



वाणिज्य प्रदर्शन : प्रमुख पाहुणे
मा. श्री. चंद्रराव तावरे,
चेअरमन माळेगांव साखर कारखाना



विज्ञान प्रदर्शन : प्रमुख पाहुणे
मा. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार,
अध्यक्ष, कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती

## प्रासंगिक कार्यक्रम - ५



राष्ट्रीय छात्रसेना निरीक्षण : प्रमुख पाहुणे मा. श्री. जंबुकुमार शहा



बॅडमिंटन स्पर्धा : उद्घाटन हस्ते मा.श्री. सी. डी. कोनाळे अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश, बारामती



खो-खो (मुले) स्पर्धा.
उद्घाटक : मा. श्री. बी. एस्. पन्हाड, तहसीलदार, बारामती.



खो-खो (मुली) स्पर्धा
उद्घाटक : मा.श्री.शांतीकुमार शहा नगरसेवक, बारामती.

राष्ट्रीय सेवा योजना



सावळ येथील शिबीरात श्रमदान करतांना विद्यार्थी

## प्रासंगिक कार्यक्रम - ६

जिमखाना पारितोषिक वितरण समारंभ



जिल्हाधिकारी मा. श्री. श्रीनिवास पाटील व सौ. रजनी पाटील यांचा सत्कार



मा. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार यांचा सत्कार



साध्वी अहिल्यादेवी यांचे तैलचित्र महाविद्यालयास समर्पण



सौ. रजनी पाटील यांचे हस्ते पारितोषिक वितरण



राष्ट्रीय सेवा योजना प्राचार्यांसमवेत कार्यक्रम अधिकारी व गटप्रमुख

# राष्ट्रीय छात्रसेना



कॅप्टन एम्. व्ही. गोडसे
(रिफ्रेशर कोर्स, कामटी, नागपूर)



प्राचार्यांसमवेत एन्.सी.सी. रँक होल्डर्स



आर्. एफ्. जगताप
सीनियर अंडर ऑफिसर



पी. के. वाघमोडे
अंडर ऑफिसर प्रशिक्षण शिबीर, वरवंड



बी. एस्. माळशिकारे
अंडर ऑफिसर प्रशिक्षण शिबीर, वरवंड



आर्. एस्. जराड
अंडर ऑफिसर, ट्रेकिंग कॅम्प



एस्. के. वेदपाठक
कं. क्वार्टर मास्टर



एम्. बी. कदम
अंडर ऑफिसर आर्. डी. परेड सहभाग



डी. व्ही. खलाटे
आर्.डी.परेड सहभाग



एम्. व्ही. बंडगर
ट्रेकिंग कॅम्प

## राष्ट्रसंत आचार्य १०८ श्री आनंदऋषी महाराज महानिर्वाण प्रसंगी भावपूर्ण श्रद्धांजली



जैन समाजाचे आदरणीय जेष्ठ धर्मगुरु आचार्य सम्राट राष्ट्रसंत १०८ श्री आनंदऋषीजी महाराज यांचे शनिवार दिनांक २८.३.९२ रोजी महानिर्वाण झाले. त्यामुळे संपूर्ण भारतातील जैन समाजात शोककळा पसरली. आचार्य आनंदऋषी महाराज हे गुरुवर्य रत्नऋषी महाराजांचे शिष्य होते. ते कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांनी संस्कृत व प्राकृत ग्रंथांचा अभ्यास केलेला होता. शिवाय हिंदी, मराठी, उर्दू, बंगाली, फारशी, इंग्लीश या भाषांचाहि अभ्यास केला होता. आयुष्यभर जिज्ञासू वृत्तीने ज्ञानसाधना करीत राहिले. ज्ञान साधनेबरोबरच त्यांनी सदाचाराचा प्रसार प्रभावी व्याख्यानातून केला. त्यांनी सर्व धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता. विद्वत्ता व वक्तृत्वाच्या जोडीला त्यांचा कंठहि सुमधुर होता. त्यामुळेच त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली.

दीक्षा घेतल्यापासून आजपर्यंत आचार्यश्रींनी महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, जम्मू आदी प्रांतात विहार करून जैन धर्माची उज्ज्वल ज्योत प्रज्वलीत ठेवण्याचा अखंडपणे प्रयत्न केला. शिवाय लाखो जैन बांधवांचे प्रबोधन तर केलेच. शिवाय हजारोंच्या संख्येने अजैन बांधवांच्या मनात अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य या तत्वांबद्दल श्रद्धा उत्पन्न केली. त्यांच्या उपदेशाने कित्येक ठिकाणी जीवहत्याहि बंद झाली.

जैन समाजात विविध पंथ व संप्रदाय असून या संप्रदाय भेदांमुळे आपसात कटुता वाढली म्हणून आचार्यश्रींनी यांच्यातील ऐक्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. पूज्य आचार्यश्रींनी प्रेरणा देऊन ज्ञानदान देणाऱ्या संस्था काढल्या. गरिबांसाठी आर्थिक सहाय्य व वैद्यकीय सेवा देणाऱ्या संस्थांची स्थापना करविली. समाजातील गरीब, निराधार व वृध्द बंधु-भगिनींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी ''आनंद प्रतिष्ठान'' संस्थेची स्थापना केली. याशिवाय विविध समाजसेवी संस्थांची स्थापना करणेस प्रेरणा दिली.

आचार्य आनंदऋषी हे राष्ट्रसंत होते. त्यांच्या मनात संप्रदायभेद नव्हता. सर्वधर्माविषयी त्यांचे ठायी समभाव होता, त्यांच्या अहंकारविरहित वाणीत गोडवा होता. पायात पद्म व तळहातावर चक्र अशी सिद्ध पुरुषाची लक्षणे त्यांच्या अंगी होती. त्यामुळे त्यांच्या दर्शनाने सान्निध्याने मंगल होते, विघ्न निवारण होते, अशी अनेकांची श्रद्धा होती. आयुष्यभर त्यांनी साऱ्या जगाला प्रेमाचा, सेवेचा मंत्र दिला. त्यामुळेच केवळ जैन नव्हे तर सर्व समाजाचे ते श्रद्धास्थान होते. हे तपस्वी जीवन अनंतात विलीन झाले तरी त्यांचा उज्ज्वल संदेश लोकांच्या मनात कायम राहिल.

त्यांच्या पवित्र आत्म्यात आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

# महाविद्यालयाचे अंतरंग

## स्थापना : दिनांक २३ जून १९६२

**१) विद्यार्थी संख्या : वरिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| कला शाखा | ७४६ |
| विज्ञान शाखा | ४२४ |
| वाणिज्य शाखा | ४०१ |
| एकूण | १५७१ |

**पदव्युत्तर वर्ग**

| | |
|---|---|
| एम.ए. | ३३० |
| एम.कॉम. | १७० |
| एम.पी.एम्. | ११ |
| एकूण | ५११ |

**कनिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| कला शास्त्र | ५२२ |
| विज्ञान शाखा | ४७४ |
| वाणिज्य शाखा | २०१ |
| व्यावसायिक शिक्षण | ४२ |
| एकूण | १२५१ |

**पदविका वर्ग**

| | |
|---|---|
| डी.बी.एम्. | १८ |
| डी.सी.एम्. | १३ |
| डी.टी.एल्. | १६ |
| एकूण | ४७ |

**सर्टिफिकेट कोर्स**

| | |
|---|---|
| (प्रमाणपत्र अभ्यासवर्ग) | |
| ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम | १३ |
| इंग्लिश सर्टिफिकेट कोर्स | ३८ |
| एकूण | ५१ |
| महाविद्यालयाची एकूण विद्यार्थी संख्या | ३५३१ |

**२) सेवक वर्ग**

| | |
|---|---|
| प्राध्यापक - कनिष्ठ महाविद्यालय | ४९ |
| वरिष्ठ महाविद्यालय | ८२ |
| एकूण | १३१ |
| शिक्षकेतर सेवक | ६१ |

**३) परीक्षा निकाल (मार्च/एप्रिल १९९१)**

**अ) (वरिष्ठ महाविद्यालय) विद्यापीठ परीक्षा**

| | |
|---|---|
| बी.ए. | ८२.४२ टक्के |
| बी.कॉम्. | ५०.५२ टक्के |
| बी.एस्सी. | ५५.१० टक्के |
| बी.लिब्.सायन्स | ४४.५० टक्के |
| एम्.कॉम्. | ६६.३७ टक्के |
| एम्.ए.मराठी | ५२.६३ टक्के |
| इंग्रजी | ०४.०१ टक्के |
| हिंदी | ३५.०० टक्के |
| अर्थशास्त्र | ७०.०० टक्के |
| इतिहास | ६७.६६ टक्के |
| इंग्लिश सर्टिफिकेट कोर्स | ५५ टक्के |

**ब) (कनिष्ठ महाविद्यालय)**

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (एच्.एस्.सी.मार्च १९९१)

१२ वी

| | |
|---|---|
| कला | ५५.४२ टक्के |
| विज्ञान | ६५.८५ टक्के |
| वाणिज्य | ५६.४५ टक्के |
| व्यावसायिक शिक्षण | १०० टक्के |

**४) वसतिगृह विद्यार्थी संख्या**

| | |
|---|---|
| मुलांचे वसतिगृह | १९५ |
| मुलींचे वसतिगृह | १०० |
| एकूण | २९५ |

**५) प्राध्यापकांनी संपादन केलेली पदवी/पुरस्कार-सन्मान**

**पुरस्कार-सन्मान/पदन्नोती**

| | |
|---|---|
| प्राचार्य डॉ.जे.के.गोधा | 'आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार' सन्मान (महाराष्ट्र राज्य) |
| प्रा.एम्.व्ही.गोडसे | एन्.सी.सी.कॅप्टनपदी पदोन्नती संपादन |

**पदवी**

| | |
|---|---|
| १. प्रा.आर.व्ही.जोशी | एम्.फिल् (अर्थशास्त्र) पुणे विद्यापीठ |
| २. प्रा.पी.आर्.पाटील | एम्.फिल्. (इंग्रजी) द. गुजराथ विद्यापीठ |



**६) पुणे विद्यापीठ विद्याशाखा-अभ्यास मंडळावर प्राध्यापकांची निवड :**

| | |
|---|---|
| १. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | व्यवस्थापन,कार्यकारणी परिषद सदस्य |
| २. प्रा. ए. एस्. किणिंगे | मानव्य,नीति व समाजविज्ञान |
| ३. प्रा. एस्. पी. कदम | मानव्य,नीति व समाजविज्ञान |
| ४. प्रा. पी. आर्. पाटील | मानव्य,नीति व समाजविज्ञान |
| ५. प्रा. बी. बी. पाटील | विज्ञान |

**अभ्यास मंडळे**

| | |
|---|---|
| १. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | व्यवस्थापन (अध्यक्ष) |
| २. प्रा. एस्. पी. कदम | समाजशास्त्र (अध्यक्ष) |
| ३. प्रा. बी. बी. पाटील | गणित (सदस्य) |
| ४. प्रा. बी. एस्. माने | मानसशास्त्र (सदस्य) |
| ५. प्रा. पी. आर्. पाटील | संरक्षणशास्त्र (सदस्य) |
| ६. प्रा. व्ही. जी. पडवेकर | संख्याशास्त्र (सदस्य) |
| ७. प्रा. टी. के. खोत | संरक्षणशास्त्र (स्वीकृत सदस्य) |
| ८. प्रा. एम्. बी. कंडारकर | हिंदी (स्वीकृत सदस्य) |

**७) नवीन नेमणुका (प्राध्यापक)**

| अ) वरिष्ठ महाविद्यालय | ब) कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|
| १. प्रा. पी. बी. घेरे (मराठी) | १. प्रा. एन्. के. बोरावके (पदार्थ विज्ञान) |
| २. प्रा. आर्. के. वानखडे (भूगोल) | २. प्रा. के. बी. बारगुजे (पदार्थ विज्ञान) |
| ३. प्रा. व्ही. सी. काकडे (संख्याशास्त्र) | ३. प्रा. आर्. एम्. धालपे (वनस्पती शास्त्र) |
| ४. प्रा. एस्. टी. पवार (सूक्ष्मजीवशास्त्र) | ४. प्रा. सी. एम्. झावरे (वनस्पती शास्त्र) |
| ५. प्रा. बी. व्ही. झगडे (मराठी) | ५. प्रा. एस्. पी. नेवासकर (इलेक्ट्रॉनिक्स) |
| ६. प्रा. वाय. डी. देसले (शारीरिक शिक्षण) | ६. प्रा. कु. एस्. पी. पवार (लायब्ररी सायन्स) |
| | ७. प्रा. डी. पी. दीक्षित (संगणकशास्त्र) |

**प्राध्यापकांचा सहभाग व इतर विशेष :**

१. **प्राध्यापक ए. एस्. किणिंगे (इतिहास) : शोधनिबंध** डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त महाविद्यालयात आयोजित चर्चासत्रात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कल्याणकारी राज्य' विषयावर शोध निबंध सादर व सक्रिय सहभाग.

२. **प्रा. व्ही. डी. काकडे (राज्यशास्त्र) : शोधनिबंध** डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागातर्फे चर्चासत्राचे आयोजन, संयोजन, चर्चासत्रात 'डॉ. आंबेडकर नेतृत्व आणि चळवळ' या विषयावर शोध निबंध सादर सक्रिय सहभाग.

**व्याख्याने**

१. 'डॉ. आंबेडकरांचे भारतीय राज्यघटनेत योगदान'
२. 'अरब-इस्त्राईल संघर्ष'

३. **प्रा. डॉ. व्ही. व्ही. आचार्य (अर्थशास्त्र) ग्रंथ प्रकाशन :** ""Prosperity Through Lift Irrigation" A rivised Doctoral Thesis published by Himalaya Publication - Delhi - Bombay (ICSSR sanctioned Publication Grant of Rs. 10,000/-)

४. **प्रा. पी. आर्. पाटील (संरक्षणशास्त्र) : सहभाग -** 'India's security perspectives' या विषयाच्या चर्चा सत्रात सहभाग, भोसला मिलीटरी कॉलेज, नाशिक.
**रिफ्रेशर कोर्स :** अलाहाबाद विद्यापीठात पूर्ण केला "All India Second Refresher Course in Defence Studies"

५. **प्रा. आर्. डब्ल्यू. जोशी (अर्थशास्त्र) : एम्.फिल्.पदवी** संपादन (पुणे विद्यापीठ)
**संशोधन विषय :** "Study of Sugarcane Transport from producer members to the factory" a case study of the Malegaon Sahakari Sugar Factory Ltd., Shivanagar. Dist-Pune
**सहभाग :** १५ वे मराठी अर्थशास्त्र परिषद - नांदेड 'ऊसतोडणी कामगारांच्या समस्या-उपाय' या विषयावर शोधनिबंध सादर व सहभाग.

६. **प्रा. डी. बी. जगताप (इतिहास-कंपनी कायदे)** पुणे विद्यापीठ आयोजित कार्यशाळेत (Workshop) लोणावळा येथे Business "Law practicals" कार्य-चर्चासत्रात सहभाग.

७. **प्रा. एम्. एम्. गलांडे (फलोद्यानशास्त्र)**

**सहभाग** - डॉ. आंबेडकर जन्मशताब्दीनिमित्त महाविद्यालयात चर्चासत्रात 'सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष व भारतीय समस्या बाबत डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन' या विषयावर शोध निबंध सादर - सहभाग.

**व्याख्यान** - 'पिक संरक्षण' विषयावर राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम शेतकरी प्रशिक्षण केंद्र-भिगवण, इंदापूर

**लेख** - ''अंधश्रद्धेतून पुन्हा नागपंचमी'' या विषयावर लेख.

''आदरांजली'', ''क्रांतीसूर्य'', ''स्फूर्ती'', रणसिंग साप्ताहिकात प्रकाशित

८. **प्रा. टी. एस्. सावंत (इंग्रजी)**

Central Institute of English and Foreign Languages, Hyderabad

येथून "PGCTE" प्रमाणपत्र संपादन

९. **प्रा. डी. के. बिन्नर (इंग्रजी)**

Central Institute of English and Foreign Languages, Hyderabad

येथून "PGCTE" प्रमाणपत्र संपादन

१०. **प्रा. ए. एस्. पंढरी (संख्याशास्त्र)** : पुणे जिल्हा साक्षरता अभियान कार्यक्रमात सक्रिय सहभाग, ''व्यवसाय मार्गदर्शन'', व्याख्यान सांगवी.

११. **प्रा. बी. डी. सरवदे (इंग्रजी)**

Central Institute of English and Foreign Languages, Hyderabad

येथून 'PGCTE' प्रमाणपत्र संपादन

१२. **प्रा.व्ही.ए.संगई (इतिहास)**

व्याख्याने : ''भगवान महावीरांची अहिंसा'' व ''कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य'' (बारामती कोऱ्हाळे)

१३. **प्रा.डॉ.डी.के.मगदूम (वनस्पतीशास्त्र) :**

सहभाग : १५ व्या इंडियन सायन्स कॉंग्रेस बडोदा अधिवेशनात ''कवकशास्त्र'' यावर शोधनिबंध सादर - सहभाग.

प्रकाशित शोध निबंध

1. "CAM - Behaviour in a Weed" - Thlaspi arvensel Photoynthetica 25 (i) PP-129-131

2. "Ecophysiological Studies in some Weeds of Baramati - I - Floristic analysis."
– Biol India 2 (1 & 2) PP 73-78

3. "Pycnidial Fungi from Maharashtra" - II
– Biol India - 2 (1&2) PP 91-94

4. Enumeration of Medicinal Plants from Baramati area - J Econ Tax Bot - 1991

5. Pycnidial Funigi from Maharashtra - I Indian Bot-Reptr 10 (1) 1991

१४. **प्रा.डॉ.आर्.डी.जोसेफ (वनस्पतीशास्त्र)**

32 rd Annual Association of Microbiologists of India, Kamraj University - Madurai (T.N.)

"Screening of Soil Fungi for Anylase production"

शोध निबंध सादर - सहभाग

१५. **प्रा. सौ. एन्. ए. पाटील (वनस्पतीशास्त्र)**

**सहभाग** - आठवी वार्षिक राज्यस्तरीय ऊस विकास कार्यशाळेत वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी-बुद्रुक (पुणे) सहभाग.

**शोध निबंध :**

National Seminor on Recent advances in Plant Science under the aspices of University of Bombay.

बिर्ला महाविद्यालय, कल्याण (मुंबई)

"Physiological Responses of Grount nut Genotype to Water stress"

या विषयावर शोध निबंध सादर सहभाग

प्रकाशित लेख : गर्भजल परीक्षा, शेती विज्ञान वार्ता (बारामती)

१६. **प्रा. डॉ. एस्. एस्. देवकुळे (वनस्पतीशास्त्र)**

**सहभाग :** १. अखिल भारतीय वनस्पतीशास्त्र परिषद लखनौ विद्यापीठ, लखनौ येथे शोधनिबंध स्विकार व प्रसिद्धी

२. अखिल भारतीय सूक्ष्मजीवशास्त्र चर्चासत्र कोईमतूर विद्यापीठ, तामिळनाडु, शोधनिबंध स्विकार-वाचन व प्रसिद्ध.

**शोध निबंध प्रकाशित**

'बायोविगयानम' शास्त्रीय जर्नलसमध्ये तीन शोध निबंध प्रसिद्ध झाले.

1. Study of Leaf of Crotalina retusa Linn from Pharmacognostic point of view.

2. Phytochemical Studies on Roots of Mucuna Pruriens Baker.

3. Pharmacognostic study of Leaf of Desmodium tritlorum Dc.

'बायोजाजिया इंडिया' शास्त्रीय जर्नल्समध्ये Pharmacognostic Study of Leaf of Vigna Tricobota (Linn) Varde या विषयावर शोध निबंध प्रसिद्ध झाला. ''इंडियन बोटानिकल रिपोर्टर'' शास्त्रीय जर्नल्समध्ये 'Pharmacognostic Studies on Roots of Crotalaria retusa Linn.' या विषयावर शोध निबंध प्रसिद्धी.

१७. **प्रा. ए. सी. खान (सूक्ष्मजीवशास्त्र)**

"32rd Annual Association of Microbiologists of India", Kamraj University, Madurai (T.N.)

"Antibacterial Activity of Essential oils of Thlaspi Avvense Linn and Wagatea Spicata Dalzell."

या विषयावर शोध निबंध सादर - सहभाग

१८. **प्रा. एस्. एन्. पाटील (ग्रंथालय)**

पुणे विद्यापीठात ''ग्रंथालयात संगणकाचा वापर'' हा कोर्स पूर्ण केला.

## महाविद्यालयात संपन्न झालेले कार्यक्रम समारंभ

### महाविद्यालय वर्धापन दिन :

२९ वा वर्धापन दिन दि. २३. जून १९९१ रोजी मा. श्री. सी. डी. कोनाळे, जिल्हा सत्र न्यायाधिश, बारामती प्रमुख पाहुणे व मा. श्रीमानशेठ जंबुकुमार शहा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

### सद्भावना दिन :

स्व. राजीव गांधी जयंतीनिमित्त दि. २१.८.९१ रोजी प्रमुख पाहुणे श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष व श्री. किरण गुजर, सदस्य बारामती नगरपरिषद यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

### कर्मवीर जयंती :

कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती दिनांक २७ सप्टेंबर १९९१, प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले, माजी कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ, यांच्या उपस्थितीत संयुक्तपणे संपन्न झाला.

### वादविवाद स्पर्धा :

कविवर्य मोरोपंत वाद वक्तृत्व स्पर्धा दिनांक ४ व ५ ऑक्टोबर १९९१ रोजी संपन्न झाल्या. मा. श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष, बारामती यांनी उद्घाटन केले व मा. श्री. रामप्रसाद बोर्डे व प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी परिषद, पुणे विद्यापीठ, यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

### चर्चासत्रे :

**राज्यशास्त्र :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त दि. २८, २९ व ३० नोव्हेंबर १९९१ रोजी चर्चासत्र झाले. मा. श्री. बाळासाहेब भारदे माजी सभापती विधानसभा हे उद्घाटक व मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले माजी कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते समारोपाचा कार्यक्रम पार पडला.

**अर्थशास्त्र :** ''कृषि वित्त पुरवठा'' या विषयावर दिनांक २१ मार्च १९९१ रोजी मा. श्री. एस्. एल्. हिरेमठ प्रमुख पाहुणे व प्रा. डी. पी. आपटे उद्घाटक होते.

**हिंदी :** ''नयी कवितामे रस वक्रोक्ति और ध्वनिसिद्धान्तकी सार्थकता'' या विषयावर दिनांक २१ मार्च १९९१ रोजी डॉ. रामजी तिवारी यांच्या उपस्थितीत पार पडले.

### साक्षरता मंच :

राष्ट्रीय साक्षरता मंच कार्यक्रम दिनांक ३० नोव्हेंबर, १९९१ रोजी पद्मश्री आप्पासाहेब पवार प्रमुख पाहुणे व जिल्हाधिकारी श्रीनिवास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

### प्रदर्शने :

**वाणिज्य व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन :** दिनांक २५ ते २७ जानेवारी १९९१ या काळात केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन पद्मश्री आप्पासाहेब पवार यांनी व वाणिज्य प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. चंद्रराव तावरे यांनी केले.

**सत्कार :**

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचा "आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार" निमित्त मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते सत्कार समारंभ संपन्न झाला.

पुणे विद्यापीठ, कार्यकारणी परिषद सदस्य निवड.

प्राध्यापक-शिक्षकेतर सेवकांतर्फे सत्कार.

**पारितोषिक वितरण :**

गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ : दिनांक २९ फेब्रुवारी, रोजी मा. कुलगुरु डॉ. श्रीधर गुप्ते, प्रमुख पाहुणे व सौ. शरयू गुप्ते यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

**क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ :** दिनांक २७ मार्च १९९२ रोजी जिल्हाधिकारी श्रीनिवास पाटील हे प्रमुख पाहुणे व सौ. रजनी पाटील यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

**तैलचित्र भेट :**

दिनांक २७ मार्च १९९२ रोजी आजी, माजी विद्यार्थ्यांतर्फे साध्वी अहिल्याबाई होळकर यांचे तैलचित्र मा. पद्मश्री आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते महाविद्यालयास भेट दिले.

❀ ❀ ❀ ❀

## HOW TO MAKE THE BEST OF LIFE ?

Act righteously
Apply tenaciously
Argue tactfully
Aspire worthily
Bathe reqularly
Behave properly
Breathe rhythmically
Contemplate seriously
Concentrate systematically
Dress simply
Drink slowly
Eat temperately
Endeavour sincerely
Endure courageously
Exercise daily
Fast fortnightly
Give generously
Hope faithfully
Invest prudently
Joke nicely
Judge charitably
Listen attentively
Look gently
Love purely
Live piously
March boldly
Meditate deeply
Obey implicitly
Observe keenly
Pay promptly
Plan wisely
Play occasionally
Pray devotedly
Premise carefully
Qualify qualitatively
Read selectively
Realise quickly
Rest frequently
Risk cautiously
Serve willingly
Sing fervently
Sleep moderately
Smile serenely
Speak sweetly
Stick resclutely
Study diligently
Talk briefly
Think constructively
Trust fairly
Travel lightly
Vete justly
Wait Patiently
Walk erectly
Work Efficiently
Write distinctly
Yield graciously

Complied by : Miss Deepa S Deshi
F.Y.B.Sc.



# प्राचार्य डॉ.जे.के.गोधा : व्यक्ती आणि कार्य

## (आदर्श शिक्षक राज्य पुरस्काराच्या निमित्ताने)

**डॉ. व. मा. कोठारी**
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी



आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांना यंदाचा विद्यापीठ पातळीवरील 'आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार' महाराष्ट्र शासनाने प्रदान करून त्यांच्या कार्याचा यथोचित मान सन्मान केला तसेच ते पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रतिनिधी म्हणून निवडून आले. या दोन्ही घटना अनेकांत एज्युकेशन सोसायटी व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेत मोलाची भर टाकणाऱ्या आहेत.

बारामती हे तसे तालुक्याचे गाव. शिवलीलामृतकार श्रीधर स्वामी व मयुरकवी मोरोपंत यांच्या वास्तव्याने पवित्र झालेली बारामती ही पुण्यनगरी. या नगरीचा सांस्कृतिक वारसा फार जुना आहे. मा. शरदचंद्रजी पवार यांचे नेतृत्व व संघटन कौशल्य, मा. आप्पासाहेब पवारांचे कृषि विकास प्रतिष्ठान यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक बारामती या पुण्यनगरीत आपली पायधूळ झाडतात. हीच परंपरा कायम ठेऊन शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी बजावून प्राचार्य गोधा यांनी बारामतीचे नाव अजरामर केले आहे.

२३ जून १९६२ पासून म्हणजे महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच डॉ. गोधा महाविद्यालयाच्या सेवेत आहेत. सुरुवातीची १२ वर्षे ते कॉमर्स विभाग प्रमुख म्हणून अध्यापन कार्य करीत होते. या काळात महाराष्ट्रातील मुंबई राज्याची विक्रीकर कार्यपद्धती व व्यवस्थापन या विषयावर प्रबंध लिहून १९६९ मध्ये पुणे विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी त्यांनी संपादन केली. त्यांचा उत्साह, कार्यपद्धती आणि कठिण जबाबदाऱ्या स्वीकारण्याची आणि पेलण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन अनेकांत एज्युकेशन सोसायटीने महाविद्यालयाच्या संपूर्ण हिशोबाची महत्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली व जून १९७४ मध्ये संस्थेने महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.

गेल्या १८ वर्षांच्या आपल्या प्राचार्य पदाच्या कालावधीत त्यांनी या महाविद्यालयाचा चेहरामोहराच बदलून टाकला. एका साधारण महाविद्यालयाचे रुपांतर त्यांनी एका आदर्श महाविद्यालयात करून टाकले. वेगाने वाढणारी विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली, व संस्थेच्या सहकार्याने अनेक इमारती त्यांनी उभ्या केलेल्या आहेत. समृद्ध ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान कार्यशाळा, भाषा प्रयोगशाळा, स्पर्धा परीक्षा केंद्र, आरोग्य केंद्र, शैक्षणिक व क्रीडा साहित्याची रेलचेल निर्माण करून बारामती परिसराच्या प्रतिष्ठेला शोभेल असे एक महाविद्यालय त्यांनी निर्माण केले. हिरव्यागार वृक्षवेलींनी बहरलेला महाविद्यालय परिसर स्वच्छ शांततेने युक्त असलेला महाविद्यालयाचा परिसर अनेक पाहुण्यांच्या कौतुकाचा विषय बनून राहिलेला आहे.

केवळ भौतिकच नव्हे तर महाविद्यालयाच्या गुणात्मक प्रगतीकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेले आहे. एच.एस्.सी. ते एम्.ए., एम्.कॉम. पर्यंतच्या विविध वर्गात आणि विषयात अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकली आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संपादन केलेले क्रीडा नैपुण्य इतरांना हेवा वाटावा असेच आहे. तसेच विद्यापीठाचा युवक महोत्सव, विभागीय व अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय मुलींच्या कबड्डी व खो खो स्पर्धा त्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे संपन्न झालेल्या आहेत.

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांनी विद्यापीठ पातळीवर केलेले कार्य उल्लेखनीय आहे. प्राचार्य या नात्याने विद्यापीठात जी पदे प्राप्त होऊ शकतात अशी सर्व महत्वाची पदे त्यांना प्राप्त झालेली आहेत. पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यासमंडळाचे अध्यक्ष, १९८२-८५ या काळात वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता, कार्यकारिणी सदस्य, विद्यापरिषदेचे अनेक वर्षे सभासद, प्राध्यापक

व प्राचार्य निवड समितीतील कुलगुरुंचे प्रतिनिधी, पुणे व शिवाजी विद्यापीठाच्या कॉमर्स फॅकल्टीतील एम्.फिल. पी.एच्.डी. चे मार्गदर्शक, पी.एच्.डी. प्रदेश सदस्य इ. महत्वाच्या पदावर कार्य करून आपल्या कार्याचा ठसा त्यांनी उमटविलेला आहे. पुणे विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष व सचिव म्हणून त्यांनी केलेले कार्य विशेष मोलाचे आहे. प्राचार्यांच्या अधिवेशनाचे आयोजन करून त्यात शैक्षणिक समस्यांची चर्चा करून सदर प्रश्न प्राचार्य संघटनेमार्फत शासनासमोर मांडून त्या त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात त्यांनी पुढाकार घेतलेला आहे. पुणे विद्यापीठाच्या क्रीडा मंडळाचे अध्यक्ष, म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. गुणवत्तेवर वर्ग प्रतिनिधींच्या निवडणूका व्हाव्यात यांची नांदीच त्यांनी घालून दिलेली आहे. अशा प्रकारे सिनेट, विद्या परिषद, अभ्यास मंडळ, क्रीडा विभाग, चौकशी समिती, फायनान्स कमिटी, विद्यापीठीय परीक्षा व फी कमिटी इ. महत्वाच्या कमिट्यावर आपल्या कार्याचा ठसा उमटवून विद्यापीठाची आर्थिक बाजू सुधारण्यात त्यांनी मोलाची भर घातली आहे. विद्यापीठ पातळीवरील विविध अधिकार पदाच्या जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडून सचोटी व निःस्वार्थ सेवा कार्याचा उत्तम आदर्श त्यांनी घालून दिलेला आहे. आपल्या महाविद्यालयाची हिशोब पद्धती त्यांनी चोख ठेवलीच. त्याचबरोबर इतर संस्थानी त्यांच्या हिशोब पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ही विशेष आनंदाची बाब आहे.

असोसिएशन ऑफ कॉमन वेल्थ युनिव्हर्सिटीज, लंडन संस्थेकडून त्यांना सिनियर ट्रॅव्हलिंग फेलोशिप १९८६ मध्ये मिळाली. त्या निमित्ताने त्यांनी केनियामधील नौरोबी, केनियाटा, झांबिया मधील झांबिया, टांझानिया मधील दारेसलाम, झिंबाम्बे मधील झिम्बांबे या विद्यापीठांना भेटी दिल्या. तसेच इंग्लंडमधील लंडन, केंब्रिज, ईस्ट ॲग्लिया, सरे, लीडस्, नॉटिंगहॅम, लँकेस्टर, एडिनबर्ग, मिल्टन किंग्ज अशा एकूण १५ विद्यापीठांना भेटी देऊन तेथील शिक्षण प्रक्रियेची सर्वांगिण पाहणी केली. प्राचार्य गोधा यांची कार्यपद्धती आणि कार्यक्षमता वाखाणण्यासारखी आहे. एखाद्या कार्याला वाहून घेणे, कामाशी एकरुप होणे, कामाने झपाटून जाणे, या संज्ञाच्या अर्थाचे साक्षात दर्शन त्यांच्या क्षणिक सहवासातही आपणास घडते. काम, काम व सतत काम हा त्यांचा जीवनमंत्र आहे. काटेकोर नियोजनावर त्यांचा कटाक्ष आहे. कार्यात्मक असमाधानी वृत्ती हीच त्यांची प्रेरक शक्ती आहे. लहानमोठ्या अशा सर्वच प्रश्नांचा सर्वांगिण आणि समातोल विचार करणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. अविश्रांत परिश्रम, दूरदृष्टी, चिकाटी, निष्ठा आणि कमालीचा अभ्यासुपणा हे त्यांचे गुण आहेत. त्यांच्या संपर्कात जो येतो तो त्यांना विसरु शकत नाही. लहानसान गोष्टही त्यांच्या नजरेतून सुटू शकत नाही. वास्तवतेचे भान त्यांना कधी पारखे होते नाही. परिणामतः यश त्यांचेपासून दूर जाऊ शकत नाही. म्हणून डॉ. गोधा यांचे जीवन हे एक यशोगाथाच बनलेली आहे.

महाविद्यालयाचे व्यवस्थापन करतांना आपल्या सहकाऱ्यांशी कधी मतभेद झाले असतील नाही असे नाही. पण आपल्या हातून इतरांचे वाईट होणार नाही. झाले तर चांगलेच व्हावे याच जीवनदृष्टीने त्यांनी कार्य केलेले आहे. प्रशासकीय आणि अध्यायनाशी निगडीत कामाबाबत काटेकोरपणे वागणारे डॉ. गोधा आपले मित्र, सहकारी व सेवकांच्या व्यक्तिगत अडीअडचणी प्रसंगी कमालीजे उदार व हळवे होतात. कै. डॉ. पुराणीक, डॉ. डी. टी. पाटील, प्रा. अशोक मेहेर इ. च्या कुटुंबियांना त्यांनी व्यक्तीगत आणि संस्थेच्या पातळीवर जी काही आणि ज्या मर्यादेपर्यंत जाऊन मदत केली ती विसरणे शक्य नाही. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सेवेतील सर्वांसाठी 'सेवक कुटुंब कल्याण योजना' नावाची अभिनव योजना सुरु करून सर्वांना कायमचेच उपकृत केलेले आहे.

एका कुशल संघटक, मार्गदर्शक, संशोधक, व्यासंगी प्राध्यापक, उत्कृष्ट प्राचार्य म्हणून त्यांनी संपादन केलेला नावलौकिक आपणा सर्वांना अभिमान वाटावा असाच आहे. म्हणून डॉ. गोधा हे घड्याळाकडे पाहून काम करणारी व्यक्ती नव्हे तर ते संस्था, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांच्या हितासाठी सतत कार्यरत असणारी आदर्शव्यक्ती व दिव्यशक्ती आहे. डॉ. जे. के. गोधा यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रातील मौलिक कार्याची महाराष्ट्र शासनाने योग्य वेळी दखल घेवून त्यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने उचित गौरव करून त्यांच्या कार्याला प्रेरणा दिलेली आहे.

※ ※ ※ ※



# आचार्य समंतभद्र महाराज : एक लोकोपकारी महान व्यक्तिमत्त्व

कु. यशश्री धनंजय शहा
द्वितीय वर्ष विज्ञान



पूज्य आचार्य श्री समंतभद्र महाराजांचे नाव स्मरताच मनःचक्षुंसमोर एका सृजनशील, राष्ट्रसेवी शिक्षकाचे आकर्षक व्यक्तिमत्त्व साकार होतं की ज्यानं उच्चनीच, थोरामोठ्यांचा भेदभाव न करता अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांचं चारित्र्य निर्माण केलं आणि असे लोकसेवी विद्वान कार्यकर्ते निर्माण केले की, ज्या कार्यकर्त्यांनी अजीवन ब्रह्मचर्याचे व्रत घेऊन अनेक शिक्षणसंस्थांचे दायित्व स्विकारले. आचार्यश्री शिक्षण महर्षी होते. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे महत्त्व अतुलनीय आहे. भारतीय श्रेष्ठ संतांच्या परंपरेतील ते एक दैदिप्यमान रत्न होते. त्यांनी केलेली सरस्वतीची सेवा पाहून माता सरस्वतीही धन्य झाली.

## जन्म आणि शिक्षण

त्यांचा जन्म महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यातील करमाळा गावी मार्गशीर्ष कृष्ण ४ संवत् १९४८ मध्ये एका व्यापारी कुटुंबात झाला. त्यांचं लहानपणीचं नाव देवचंद होतं. त्यांच्या वडिलांचं नाव कस्तूरचंद आणि आईचं नाव कंकूबाई होतं. दोघेही, आईवडील मोठ्या धार्मिक प्रवृत्तीचे व स्वाध्यायशील होते. याचा बराच प्रभाव बाल देवचंदावर पडला.

त्याच दिवसात प्रसिद्ध क्रांतीकारी नेता पं. अर्जुनलाल सेठी सांगलीत आले होते. त्यांचे विचारप्रवर्तक, विचारांना चालना देणारं, उत्तेजक असं भाषण ऐकून बालक देवचंद फार प्रभावित झाला. मग त्यांनी सेठींची गाठ घेऊन त्यांच्याशी परिचय वाढविला. देवचंद आणि त्यांचे आणखी चार मित्र सेठीजींच्या सांगण्यावरून 'जैन शिक्षण प्रचार समितीत' जयपूर येथे शिकायला आले. तेथे त्यांनी जैन धर्म आणि संस्कृत यांचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. हळूहळू ही जैन शिक्षण प्रचार समिती क्रांतीकारकांचे केंद्र बनत गेली. सेठीजी ह्या क्रांतीकारकांचे नेता होते. सेठीजींच्या विचारांचा मोतीचंद यांच्यावर मोठा प्रभाव होता. तर देवचंद पहिल्यापासूनच अहिंसावादी विचारांचे होते. ते मोतीचंद यांना क्रांतीकारी विचारांपासून प्रवृत्त करण्याचा खूप प्रयत्न करत होते. इतक्यातच 'नीमच महंत' हत्येची घटना घडली. पंडीत अर्जुनलाल सेठी व श्री. मोतीचंद हे त्यात पुरतेच अडकले. ह्या घटनेने देवचंद यांना अतीव दुःख झाले आणि ते बडोद्याला परतले. तेथून नंतर मुंबईत विल्सन कॉलेजमध्ये त्यांनी बी.ए. ची पदवी घेतली. कालांतराने राष्ट्रकार्यासाठी झटणाऱ्या पं. अर्जुनलाल सेठी यांना कारावासाची तर मोतीचंद यांना फाशीची शिक्षा झाली.

## ध्येयनिश्चिती

श्री. देवचंद (समंतभद्र) हे पहिल्यापासूनच राष्ट्रीय विचारांचे युवक होते. त्यांच्या रोमारोमात राष्ट्रीय भावना भिनलेली होती. त्यांच्या जीवनावर ज्या महापुरुषांचा प्रभाव पडला होता ते होते लोहपुरुष बाळ गंगाधर टिळक. टिळकांच्या अखंड देशभक्तीचा त्यांच्यावर बराच प्रभाव पडला पण त्यांचे क्रांतीकारी विचार त्यांना कधीच प्रभावित करू शकले नाहीत. अहिंसेवर त्यांची गाढ निष्ठा होती. त्यांचा ठाम विश्वास होता की भारताला जर पारतंत्र्यातून मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी अहिंसेचाच मार्ग पत्करावा लागेल. देशभक्तीच्या विचारांनी प्रभावित झालेल्या त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आपल्या शिक्षण संस्थांसाठी मुद्दामच सरकारी ग्रँट स्वीकारली नाही. याच काळात, म्हणजे पदवी शिक्षणक्रम पूर्ण करीत असतानाच त्यांनी स्वामी रामतीर्थ आणि स्वामी विवेकानंद यांचे संपूर्ण साहित्य वाचले. दोन्ही महान विचारवंतांच्या विचारांनी त्यांना सूक्ष्मपणे अभ्यासले. पण इसवी सनाच्या दुसऱ्या शताब्दीतील बरेच प्रभावित केले. विख्यात जैनाचार्य कुंदकुंद यांच्या जगप्रसिद्ध 'समयसार' ग्रंथानेच त्यांच्यात क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणले. त्यांचे संपूर्ण जीवन अध्यात्माने ओतप्रोत भरून गेले.

## गुरुकुल शिक्षण प्रणालीची स्थापना

ह्या जीवनयात्रेत 'समयसार' हे त्यांच्या आत्म्याला ज्ञानामृताकडे घेऊन जाणारे मार्गदर्शक बनले, तर त्यांच्या राष्ट्रभक्तीने त्यांच्या

विचारांना अनेक नवे पैलू पाडले. आपल्या राष्ट्रातील तरुण पिढीचे निरंतर नैतिक अवमूल्यन होत आहे. सदाचाराचे पर्यावरण दूषित होत आहे. खरे तर, आपल्या देशाने जगाला लहानमोठे अनेक धर्म दिले आणि म्हणूनच त्याला 'जगाचा गुरु' म्हटलं जातं. धर्मांच्या संख्येच्या बाबतीत आपले राष्ट्र अत्यंत समृद्ध आहे. पण आपला व्यवहार धर्मशून्य आहे. चारित्र्याच्या बाबतीत तर आपण दरिद्रीच आहोत. तोच देश उन्नत व संपन्न म्हणून गौरविला जातो की जिथले नागरिक सुशिक्षित आणि चारित्र्यवान आहेत. आपल्याला जर देशाची उन्नती करायची असेल तर प्रथम आपल्या देशबांधवांना सुशिक्षित आणि चारित्र्यवान् बनविले पाहिजे. मुले ही राष्ट्राचा पाया आहेत आणि भावी भारताचे तेच निर्माते आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता ते एका निर्णयावर आले आणि लगेच तो कृतीत उतरविण्याच्या पाठीमागे लागले. ते एका सरस्वती यात्रेवर निघाले. त्यांनी गोपाळकृष्ण गोखलेंचा भारत सेवक समाज बघितला. गुरु रवींद्रनाथ टागोरांच्या शांतीनिकेतनची कार्यपद्धती बघितली. ते आर्य समाजाच्या कांगडी गुरुकुलात गेले. जैनांच्या ऋषभदेवांच्या हस्तिनापुरात देखील पोहचले. ह्या संस्थांमध्ये त्यांनी काही काळ मुक्काम केला. तेथील संस्थाचालकांशी सतत संपर्क ठेवला आणि सरतेशेवटी ह्या निश्चयावर पोहचले की प्राचीन गुरुकुल पद्धतीने मुलांना आधुनिक शिक्षण दिले आहे. विद्यालयातील मुलांना ज्ञानाचे एक भंडार खुले करून दिले जावे आणि त्याचबरोबर मुलांवर संयम, सदाचरण आणि सेवेचे संस्कार केले जावेत.

त्यांनी आपल्या संस्थेसाठी पंचसूत्री जीवनपद्धती निश्चित केली. प्रेम, ज्ञान, शील, व्यवस्था आणि सेवा.

त्यांच्या संस्थेचा मूलमंत्र होता -

"उन्नतं मानसं यस्य, तस्य भाग्यं समुन्नतम्"

**गुरुकुलांची स्थापना -**

मनात पक्का संकल्प करून देवचंद कारंज्याला पोहचले. तिथे त्यांची भेट प्रद्युम्नसाहूजी यांच्याशी झाली. त्यांनी साहूजींना आपला संकल्प सांगितला आणि आपली योजना व्यवस्थित सांगितली. त्यांच्या योजनेने प्रभावित होऊन साहूजींनी आणि त्यांच्या चार मित्रांनी ह्या पवित्र कार्यासाठी पन्नास हजार रुपयांचे दान केले. अक्षय तृतीयेच्या (सन १८१८) पवित्रमंगल मुहूर्तावर 'महावीर ब्रह्मचार्याश्रम' ची स्थापना केली, आणि एका वृक्षाखाली सहा ब्रह्मचारी विद्यार्थ्यांना घेऊन गुरुकुल सुरु झाले. हळूहळू संख्या वाढत गेली. देवचंद हे गुरुकुलचे अधिष्ठाता होते. विद्यालयाचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संरक्षक होते. साऱ्या शिक्षण क्षेत्रात त्यांच्या ह्या अभिनव प्रयोगाबद्दल बरीच उत्सुकता होती. शेवटी जेव्हा तेथून सेवाव्रती, चारित्र्यवान्, विद्वान स्नातक बाहेर पडले तेव्हा सर्वांनी त्यांच्या ध्येयनिष्ठेचे, निश्चयाचे, त्यांच्या सफलतेचे अमाप कौतुक केले. हळूहळू मग तेथे इमारती उभारल्या गेल्या. साधनं गोळा झाली. आणि बघता बघता एक संपन्न संस्थाच तयार झाली. त्यानंतर मग त्यांनी बाहुबली (कोल्हापूर), स्तवनिधी (बेळगाव), सोलापूर, खुराई (सागर) कारकत (कर्नाटक) वागिवाडी (बेळगाव), कुंथलगिरी (उस्मानाबाद), वेरुळ (औरंगाबाद) तेरदाळ (बेळगाव) आष्टी, आकिबाद, तीरदाळ, जयसिंगपूर, सिदनाल, आवकोळ आणि टाकलीवाडी येथे गुरुकुलांची स्थापना केली. ह्या संस्थांमधून शिकलेले लाखो विद्यार्थी आज देशाविदेशात मोठ्या मोठ्या धंद्यात आणि मोठमोठ्या हुद्यांवर आहेत. ह्या त्यांच्या राष्ट्रसेवी कार्याकरिता राष्ट्र त्यांचे सतत ऋणी राहील.

देवचंद ब्रह्मचारी होते. विवाहाबद्दल त्यांनी कधीच विचार केला नाही. स्वतःच्या कार्याच्या व्यापात विवाहाचे विचार कधीच त्यांच्या मनात आले नाहीत. मुक्तागिरी क्षेत्री त्यांनी सप्तम प्रतिभा धारण केली. आणि नंतर साधना वाढवून दहावीही प्रतिभा घेतली. सन १९३३ मध्ये (वयाच्या ४२ च्या वर्षी) त्यांनी व्यावर येथे पूज्य आचार्य श्री शांतीसागर महाराजांकडून क्षुल्लकपदाची दीक्षा व व्रत ग्रहण केले. तेव्हा त्यांचे समंतभद्र असे नामकरण केले गेले. सन १९५२ मध्ये म्हणजे वयाच्या ६१ व्या वर्षी ते बाहुबली येथे आले. तेथे त्यांना पूज्य मुनी वर्धमान सागरजींनी मुनीदीक्षा दिली. नाव समंतभद्रच राहिले. वीतराग व्रत घेण्यासाठी जणू त्यांचा हा दुसरा जन्मच होता. ते पूर्णपणे अपरिग्रही बनले. संस्थांमध्ये प्रत्यक्षपणे लक्ष देणे किंवा स्वतःहून प्रत्यक्षपणे कामे करणे पण त्यांनी सोडून दिले. आणि ते उत्कृष्ट आत्मसाधना करण्यात मग्न झाले.

सहसा, एखाद्या व्यक्तीने चालू केलेली संस्था त्याच्या मृत्यूनंतर बंद पडते ही गोष्ट आचार्य समंतभद्र यांना माहीत होती. त्यासाठी त्यांनी अभिनव समंतभद्र तयार केले. गुरुकुलामधून असे काही स्नातक तयार केले की ज्यांनी अजीवन ब्रह्मचर्य व्रत आणि सेवाव्रत घेतले. त्यांच्या सर्व संस्थांचे संचालन असेच विद्वान कार्यकर्ते करत आहेत.

**अंतिम प्रयाण**

आपल्या कर्मठ जीवनाची आदर्श अशी ९७ वर्षे जगून



हा कर्मयोगी १८ ऑगस्ट १९८८ मध्ये आपले कार्य पूर्ण करून स्वर्गलोकाला धन्य करण्यासाठी निघून गेला. आचार्य समंतभद्र एक राष्ट्रीय महापुरुष होते. त्यांनी देशातील शिक्षणसमस्या सोडविण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला, तिने देशाला सेवाव्रती, विद्वान चारित्र्यवान नागरिक आणि समर्पित कार्यकर्ते दिले.

सारे राष्ट्र ह्या सरस्वतीपुत्राच्या चरणी आपला श्रद्धेचा अर्घ्य चढवीत आहे.

❊ ❊ ❊ ❊







१. शिक्षण हे काही साध्य नव्हे. ते एक साधन आहे. ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू तेच खरे शिक्षण.
- महात्मा गांधी

२. अहिंसा हा मानवजातीचा कायदा आहे. तो पाशवी सामर्थ्यापेक्षा अपार श्रेष्ठ आणि सर्वोच्च आहे.
- महात्मा गांधी

३. शेताप्रमाणेच मनाची मशागत माणसाने केली पाहिजे. कारण मनाची शुद्धता जसजशी वाढत जाते, तसतसे मनुष्याचे देवत्व जागृत होते. ती जसजशी कमी होते, तसतसे त्यांच्या अंगी पशुत्व भिनत जाते.
- इसाप

४. स्त्री ही त्यागाची मंगल मूर्ती आहे, देवता आहे. माझा प्राण जाऊ दे पण माझ्या बाळाला वाचवा, असे उद्‌गार फक्त माताच काढते.
- वि. स. खांडेकर

५. भावनेचा विचार व्यक्त करण्यास भाषा असमर्थ असते.
- रा. ग. गडकरी

६. कोणत्याही संकटाच्या सिंहगडाला, द्रोणागिरीची वाट असते.
- रा. ग. गडकरी

७. ज्यांच्याकडे घालवायला भरपूर वेळ असतो. त्यांच्याकडे बंगला नसतो, तर बंगलेवाल्याला वेळ नसतो.
- गो. नी. दांडेकर

८. मनुष्य स्वभावतः कितीही चांगला असला तरी शिक्षणाने त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय देशाची उन्नती होत नाही.
- लोकमान्य टिळक

९. न्यायाची मागणी करणाराने स्वतः न्यायी असले पाहिजे.
- महात्मा गांधी

१०. प्रत्येक माणसाला शिक्षणाचा हक्क आहे. माणसाला जगण्यासाठी अन्नाइतकेच शिक्षण आवश्यक आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

११. माणूस आणि नैतिकता हा धर्माचा केंद्रबिंदू असला पाहिजे. तसे नसेल तर धर्म ही क्रूर रुढी होते.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१२. वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शू जैसा
ज्ञानेश्वर अध्याय १८ ओवी ३४७

# ज्ञानेश्वरांचे गुरुप्रेम

कु. भापकर प्रगती हनुमंत
प्रथमवर्ष बी.ए.



"नमितो योगी, थोर विरागी तत्त्वज्ञानी संत
तो सत्कविवर परात्पर गुरु ज्ञानदेव भगवंत"

"ज्ञानीयांचा राजा गुरु महाराज" असे ज्या ज्ञानदेवांचे तुकोबांनी यथार्थ वर्णन केले आहे, 'त्या गुरूंना - गुरू असलेल्या ज्ञानदेवांनाही आत्मोद्धारार्थ निवृत्तीनाथांसारख्या सद्‌गुरूला शरण जावे लागले. किंबहुना आपल्या भारतीय परंपरेनुसार राम-कृष्ण इत्यादी अवतारी पुरुषांना देखील सद्‌गुरुच्या सान्निध्यात राहून आत्मबोध प्राप्त करून घ्यावा लागला. स्वतः गुरुस्थानी असलेल्या ज्ञानदेवांनीही आपल्या गुरुचे स्तवन नाना प्रकारे आपल्या वाङ्‌मयात ठिकठिकाणी केलेले दिसते. 'अमृतानुभव' ज्ञानेश्वरी व स्फुट अभंग या त्यांच्या वाङ्‌मयात ज्ञानेश्वर जिथे संधी मिळेल तिथे तिथे गुरुच्या श्रेष्ठतेविषयी व त्यांच्या कृपेच्या आवश्यकतेविषयी निरनिराळी रुपके योजून वर्णन करतात. अमृतानुभवातील दुसरे प्रकरण तर गुरुवर्णनपर असून ज्ञानदेवांनी त्यात आपले सारे 'उपमा रुपक' चातुर्य प्रकट केले आहे. ते म्हणतात की सद्‌गुरु हा आत्मसुख दाखविणारा आरसाच असून विखुरलेल्या कला एकवटणारी पौर्णिमाच आहे. ज्ञानेश्वरीत ज्ञानदेव प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी व जी नमने करतात त्या त्या नमनांच्या निमित्ताने त्यांनी आपले गुरु श्री निवृत्तीनाथ यांचे वर्णन केले आहे.

मात्र ज्ञानेश्वर महाराज आपल्या गुरुच्या स्थूल देहाचे वर्णन करीत नाहीत. कारण आपले गुरु श्री निवृत्तीनाथ यांना ते साक्षात परब्रह्मच समजत होते. अमृतानुभवात ते म्हणतात,

यदक्षरम् अनाख्येयं आनंदम् अजकेवलम्
श्रीमत् निवृत्तीनाथेति ख्यातम् दैवतम् आश्रये'

म्हणूनच आपल्या गुरुच्या वर्णनात गुरुच्या स्थूल देहाचे म्हणजे ते गोरे होते की काळे होते याचे वर्णन त्यांनी कोठेही केलेले नाही. तर त्यांच्या तात्त्विक स्वरुपाचे म्हणजे निर्गुण स्वरुपाचेच वर्णन ज्ञानेश्वरीतील ठिकठिकाणी आलेल्या नमनपर ओव्यातून केलेले आहे. गुरुवर्णन करताना ज्ञानदेव बहुधा रुपक अलंकाराचाच उपयोग करतात. त्यांची पहिल्या अध्यायात गणपतीच्या रुपाने तर पंधराव्या अध्यायात विद्यार्थ्यांच्या रुपकाचे वर्णन केले आहे. तर बाराव्या अध्यायात त्यांनी आईचे रुपक योजून गुरुचे वर्णन केलेले आहे.

जय-जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे
अनवरत् आनंदे । वर्षतिये ।

वास्तविक ज्ञानेश्वर महाराजांनी गुरुंचे तात्त्विक स्वरुप वर्णन करताना जी वेगवेगळी रुपके योजली आहेत ती निर्हेतुक असून त्या त्या अध्यायातील विषयाला अनुरुप आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी गुरुमाऊलीचे जे रुपक केले आहे ते सांगरुपक आहे व ते अत्यंत उत्कृष्ट झालेले आहे.

आई ही ज्याप्रमाणे आपल्या मुलांच्या बाबतीत त्याला मांडीवर वाढविणे, अंगाई गीते गाऊन त्याला झोके देणे, त्याच्या अंगावर बिंदली ताईत इत्यादी दागिने घालणे, त्याला दूध पाजणे व निजविणे इत्यादी गोष्टी करते. त्याचप्रमाणे गुरुरुपी माऊली आपल्या साधकरुपी चालकाला मूलाधार वक्रस्थित कुंडलिनी शक्तीच्या मांडीवर वाढविते. हृदय कोणरुपी पाळण्यात घालून झोके देते, मन-पवनरुपी खेळणी देते, ऋद्धीसिद्धी रुपी दागिने मुलांच्या अंगावर घालते व जीवनकलेचे दूध पाजते व म्हणूनच ज्ञानदेव गुरुकृपा दृष्टीला म्हणजेच गुरुंना आईची उपमा देतात.

शिवाय आई ही नवमास पूर्ण झाल्यानंतर मुलाला आपल्या उदराबाहेर टाकते. पण श्री गुरुरुपी माऊली साधकाला म्हणजे शिष्याला आपल्या उदरात घेते. म्हणजेच त्याला आत्मज्ञानात समाविष्ट करते. यासाठीच ज्ञानेश्वर महाराजांचे श्रेष्ठ भक्त एकनाथ महाराज, जन्म देणाऱ्या आईला सावत्र आई म्हणजेच (कमी कल्याणकारी - कमी प्रेम देणारी) म्हटले आहे. पण श्री गुरुरुपी माऊलीला सख्खी आई म्हणजेच परमश्रेय साध्य करून देणारी आई असे म्हटले आहे. तेव्हा ज्ञानेश्वर महाराज संताना म्हणजेच सद्‌गुरुंना माऊली का म्हणतात हे स्पष्ट होते.



ज्ञानेश्वर महाराज सद्‌गुरुविषयी काही लिहायला लागले की ते सद्‌गुरुची अमाप स्तुती करतात. ज्यांचा जो आवडीचा विषय असतो तो त्यास रममाण होणारच व थोडेसे अधिक बोलणारच माणसे जेवावयास बसली असता ज्यांचे जे आवडते पक्वान्न ते पानात वाढले गेले असता तो त्यावर ताव मारणारच, तद्वतच ज्ञानेश्वर महाराज सद्‌गुरुंचे वर्णन करू लागले की ते त्यात रममाण होणारच. त्यांचे ज्ञानेश्वरीच्या अखेरीला देणारे पसायदानच पहाना -

ते म्हणतात,

वर्षत सकळ मंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळी । भेटतु भुतां ।

त्या प्रमाणेच गीतेच्या १३ व्या अध्यायातील 'आचार्योपास्ति या पदाची व्याख्या करताना ज्ञानदेवांची गीतेतील व इतर कोणत्याही श्लोकातील पदावर जे व्याख्यान केले आहे, यापेक्षा आचार्योपास्ति या पदावर त्यांनी शे-दीडशे ओव्या अधिक लिहलेल्या आहेत. याचे कारण सांगतांना ते म्हणतात गुरुसेवेविषयी माझा जीव अत्यंत अभिलाषी आहे व म्हणूनच मी एवढे पाल्हाळिक व्याख्यान केले असे त्यांनी याबाबतीत म्हटले आहे.

जिये गुरुसेवेविखि. माझा जीव अभिलाखि ।
म्हणोनी सोय चुकी । बोली केली ।

ज्ञानेश्वर महाराजांचे गुरू श्री. निवृत्तिनाथ हे थोर अधिकारी होते. त्याचप्रमाणे दुसऱ्याला सारस्वत देण्याची त्यांची योग्यताही होती हे सांगताना ते म्हणतात, "हे सारस्वताचे गोड । तुम्हीची लाविले जी झाड " ।

एके ठिकाणी तर ते म्हणतात, "म्हणोनी साधका तू माऊली पिके सारस्वत तुझिया पाऊली" । ज्ञानेश्वरांची प्रत्यक्षात अशी श्रध्दाच होती की गुरू कृपा झाल्यामुळेच सर्व काही सारस्वत म्हणजे भावार्थ दीपिका, अमृतानुभव आणि शेकडो स्फुट अभंग आपण निर्माण करू शकलो आहोत.

शिवाय सद्‌गुरूला माऊली म्हणण्यात ज्ञानदेवांचा आणखीही एक उद्देश आहे. आईच्या अंतःकरणात आपला मुलगा चांगला असो वा वाईट असो पण त्यांचे निरंतर कल्याणच व्हावे, अशीच तळमळ व सदिच्छा असते. मुलांनी जरी कितीही त्रास दिला, प्रसंगी लाथाहीमारल्या तरी ती आई त्याला दूर लोटत नाही. "मारे ना का लाथा पण मुलगाच आहे ना ? असेच ती प्रेमाने म्हणते व त्याच्या कल्याणाची काळजी घेते. सद्‌गुरू देखील अशाच तऱ्हेने आपल्या शिष्यांचे लाड करतात, हट्ट पुरवितात व कल्याणाचेच इच्छितात.

म्हणून ज्ञानेश्वरांनी आपली प्रेम भक्ती व्यक्त करताना जी रूपके दिली आहेत. त्यामध्ये माऊलीचे रुपक हेच सर्वश्रेष्ठ आहे. ते म्हणतात की ही माऊली शुध्द, उदार असून अनवरत आनंदाचा वर्षाव करणारी माऊली आहे. तिचा जय-जयकार असो.

शेवटी मी देखील ज्ञानदेवांना गुरूमाऊलीच्या जागी मानून त्यांच्याच शब्दात असे म्हणते,

"जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे
अनवरत आनंदे । वर्षतिये ।"

※ ※ ※ ※

माझा मराठाची बोलु कौतुके । परि अमृतातेंही पैजेसी जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ॥१॥ ज्ञानेश्वर

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कालाकामिनी ।
ते श्री. शारदा विश्वमोहिनी । नमिली मिया ॥ ज्ञानेश्वरी

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥ रामदास स्वामी

# मराठी आख्यान कविता आणि मोरोपंत

कु. वर्षा पळसुले देसाई
एस्.वाय्.बी.एस्सी.



**मो**रोपंत कवीची देते संतोष मानवा कविता ।
असता जरी भूमीवरी,सद्गुरु तरी तोही मान वाकविता ।

ज्याप्रमाणे विविध, मोहक, गुलाबांच्या बागेत फिरणारा रसिक सगळीकडे मोहक गुलाब पाहून हर्षित होतो आणि कितीही फुले घेतली तरी ती त्याला थोडीच वाटतात त्याप्रमाणेच माझीही, मोरोपंतांच्या विस्तृत आख्यान काव्यातून निवडक वेचे काढतांना स्थिती झाली आहे.

१३ व्या शतकातील महदंबेच्या 'धवळ्या' पासून ते १८ व्या शतकातील मोरोपंताच्या कुशलवोपाख्याना पर्यंत मराठी आख्यान कवितांनी आपला वेगळेपणा टिकवीत जी वाटचाल केली व त्या वाटचालीत जी वेगवेगळी वळणे घेतली त्यात मोरोपंतांचे स्थान लक्षणीय आगळेवेगळे आहे. मराठीतील सर्व आख्यान कवितांचा उल्लेख करता येणे अशक्य आहे. ज्या मराठी आख्यान कवितांनी एक वेगळाच वाङ्मय प्रकार म्हणून सिध्द झालेल्या तिच्या रुपात जी अनमोल भर घातली त्या मोरोपंताच्या आख्यान कवितांचा मी इथे उल्लेख केला आहे.

मराठीत रामायण, महाभारताचे अनुवाद झाले आहेत. उदा. एकनाथांचे 'भावार्थ रामायण' मोरोपंताचे 'आर्याभारत, पण त्यात आख्यानात्मकता जरी असली तरी त्यांची जात महाकाव्याची आहे. त्यामुळे आख्यान कविता म्हणून त्यांचा समावेश करता येणार नाही. ज्यामध्ये रामायण-महाभारतातील एखादा कथाभाग निवडून तोच तेवढा रंगवून खुलवून सांगितला गेला असेल. ह्या रामायण कवितेला 'आख्यान' कविता म्हणतात. संस्कृतमध्ये अनेक विद्ग्ध महाकाव्ये जशी पुराणातल्या एखाद्या आख्यानावर लिहली गेली तशी महाकाव्यरुप जरी नसली तरी काही प्रमाणात त्यांच्याच धर्तीवर लिहलेली कविता म्हणजे 'आख्यान कविता'. 'महदंबेचे 'धवळे' ही मराठीतील पहिली उपलब्ध आख्यान कविता. मराठी आख्यान कवितेतील भक्ति, मुक्तीचे मूळ प्रयोजन मागे पडून तिला ते चमत्कृतिप्रधान, सांकेतिक स्वरुप आले होते ते बदलले गेले, ते पंतांच्या आख्यान कवितेमुळेच. अध्यात्मिक प्रेरणा, आख्यानात्मता यांचा बिघडलेला समतोल मोरोपंतानी साधला. मोरोपंत हे प्रथम भगवद्भक्त आहेत. त्यांचे काव्यलेखन देखील 'काही तरी तरावया गावे' या हेतूने झाले आहे. मोरोपंतानी आपल्या कवितेत भक्ति मुक्ति यांचा कथानकाशी समतोल साधल्यामुळे त्यांच्या कविता विशेष प्रसिध्द झाल्या.

'लवांकुशाख्यान, 'मदालसाख्यान, 'हरिश्चंद्रख्यान', 'प्रल्हाद विजय', सुदाम चरित्र, 'भस्मासुर आख्यान, ही पंतांची काही गाजलेली आख्याने आहेत. त्यापैकी लवांकुशाख्यान हे पंताच्या उमेदवारीच्या काळातले आहे. तरीदेखील आख्यानकविता म्हणून ते सौष्ठत्वपूर्ण झाले आहे. या आख्यानात, लक्ष्मणसीतेला वनात नेऊन सोडत असता राम, हे केवळ आपल्या दोहदपूर्तीसाठी करत आहे या सीतेच्या भाबड्या भावनेमागील नाट्य पंतांनी चांगले रंगवले आहे.

तसेच जेव्हा राम, सीता १४ वर्षांनी वनवासातून परत येतात तेव्हा सीतेच्या जावा तिला १४ वर्षातील हकिकत विचारतात. तेव्हा सीतेच्या तोंडचे उद्गार पंत आपल्या काव्यात गुंफतात ते म्हणजे -

"सीता म्हणे ऐका वनवास कथा । परि मनी व्यथा न धरावी ॥ लक्ष्मण भावोजी मागे, पुढे स्वामी । मज आहे धामी ऐसे वाटे ॥ न बाधेजे मज उष्ण क्षुधा तृषा । तुम्हापाशी म्हणा न बोलावे ॥ राम हे रघुवंशातील एक आदर्श राजा होता हे पंतांनी सांगितले आहेच शिवाय राम पत्निप्रेम, पुत्रप्रेम यालाही पारखा झालेला नाही हे पंतांनी सांगितले आहे.

अशा रीतीने पंतानी रामराज्याचे वर्णन, सीतेचे डोहाळे, सीतेचा त्याग करण्यापूर्वी रामबंधूनी रामाच्या केलेल्या विनवण्या, सीतेची रामावर निष्काम प्रीती, वाल्मिकी आश्रमी सीतेचा झालेला सत्कार, सीतेचा वनातील शोक, वनातील पशु पक्षांनी सीतेवर दाखवलेले प्रेम, कुश-लवांचे जन्म, शिक्षण हे आपल्या



'लवांकुशाख्यांना मध्ये पंतांनी मोठ्या बहरीने वर्णिले आहे.

पंतांच्या हरिश्चंद्राख्याना मध्ये मानवी व्यक्तिचित्रणास भरपूर वाव आहे. तरीही पंतांनी हरिश्चंद्र तारामती यांचे व्यक्तिचित्रण रेखाटतांना कुठेही अतिमानवी रंग चढू दिलेले नाहीत. हरिश्चंद्र, तारामती, रोहीदास ही सगळी तुमच्या आमच्या सारखीच माणसं वाटतात. उदा. जेव्हा हरिश्चंद्राला तारामतीचा त्याग करायची वेळ येते तेव्हा तारामती म्हणते, "पुत्रप्राप्तीसाठी पत्नि करायची असते. तेव्हा नाथ, आता माझा कार्यभाग झाला आहे. तेव्हा मळा आपण जरुर विका व योग्य ती दक्षिणा देऊन मोकळे व्हा". असे सांगणारी तारामती, तर त्यावर 'छे, छे अस अभद्र अवाच्च तुला बोलवतं तरी कसं ? असं म्हणून स्वतःच्या दुर्दैवाबद्दल विलाप करणारा हरिश्चंद्र, तर अशा वेळी भुकेने व्याकूळ होऊन रडणारा रोहिदास, ही सगळी तुमच्या आमच्या सारखी माणस आहेत, नाही का ? तेव्हा इंद्र हरिश्चंद्राला विचारतो 'तू राजा झालास याचं श्रेय कुणाला देतोस ? तेव्हा हरिश्चंद्र म्हणतो 'मी राजा झालो ते जनतेच्या पुण्याईमुळे, त्याच्या तोंडचे हे उद्गार पंत आपल्या काव्यात गुंफतात,

"नरवर म्हणे, कुटुंबी जे कोणी लोक तत्प्रभावी ॥ भोगितसे राज्याते राजा नच केवळ स्वभावाने ॥ ते म्या जनप्रसादें शाक्रा सर्वही अनुष्ठिले कर्म । आता पंताचे मदालसाख्यान या आख्यानात पंतांच्या आख्यान कवितांचा घाट लक्षात येईल. या आख्यानात गंधर्वकुळीचा मदालसा, मानवी कुळातील ऋतुध्वज यांच्या प्रेमाची कहाणी सांगितली आहे. ही कहाणी जरी गुंतागुंतीची असली तरी पंतांची काव्यदृष्टी निर्मळ असल्याने त्यांनी मूळ अद्भुतातही स्वाभाविकता आणली आहे. त्यापुढे ऋतुध्वज, मदालसा यांची रविवम्र्यांनि रेखाटलेली चित्रेही बोजड वाटते, मदालसा आपल्या पुत्राला त्यांचप्रमाणे समाजालाही हजारो ग्रंथाच्या साहाय्याने स्वबुध्दी सामर्थ्याने, अवलोकनाने जो धर्मनिती बोध होणे अवघड आहे तोच लहान बाळाला आपल्या आईपासून लहानपणापासून मिळतो,ते कसे ते पहा-

स्तन पाजीता निजविता
हालविता बाळकासी खेळविता ।
दे बोध जो सुदुर्लभ थोरांसी सहस्त्रकल्प मेळविता ।

पाहिलत ना, मदालसेची उपदेश करण्याची षध्दत कशी साधी सोपी, सहज होती ? पंतांनी सुदामचरित्र आख्यानात सावकारीची वेगळीत रीत वर्णन केली आहे, ती म्हणजे-

"ऋण तरी मुष्टि पोहे, तिच्या व्याजात हेमनगरी ती । मुदलात मुक्ति देणे, ही कोण सावकारीची रिती ।"

त्याचप्रमाणे पंतांचे भस्मासुर आख्यान. हे आख्यानही मोठे करमणुकीचे, मनोरंजक आहे. यात भस्मासुराला शंकराकडून मिळालेला वर, कसा शाप ठरतो ते पंतांनी मोठ्या खुबीदारपणे वर्णिलेले आहे.

अशारीतीने पंतांच्या आख्यान कविता सौमृय हास्य रस, मर्यादित करुण रस, भाषेची शुध्दता, रसिकता, मर्यादित कल्पना विस्तार यांनी ओंथबलेल्या आहेतच. थोड्याशा अवघड जरी असल्या तरी गोडी निर्माण करुद देणाऱ्या आहेत. पंताची भाषांही मोठी रसाळ, हृदयाला स्पर्श करुन जाणारी आहे. त्यांची उत्तम उदाहरणे म्हणजे -

पहिली माझी ओवी । पहिला माझानेम
तुळशीखाली राम । पोथी वाचे ॥

यांसारखी अनेक स्त्रीगीते व ओव्या. पूर्वीच्या काळी स्त्रीयाही झोपाळ्यावर बसल्यानंतर त्यांची ही स्त्रीगीते सहजतेने, आवडीने म्हणत असत. अशारीतीने पंतांच्या आध्यात्म कथाकथन यांचा संयोग साधणाऱ्या आख्यान कवितांविषयी लिहावे तेवढे थोडेच आहे. पंतांनी मराठी आख्यान कवितेच्या रुपसिद्धीत साधलेले हे कार्य नि:संशय महत्वाचे आहे. शेवटी एवढंच म्हणावे वाटते,

"कल्पनेचे कल्पतरु, विद्वान निरंतर
सरस्वतीचे निजस्थान होऊन गेले ते मयूर,
महती त्यांची पसरली चौफेर
अशा या मयूर पंतासं मी जोडते कर ॥

❊ ❊ ❊ ❊

"अज्ञानात पिचत केवळ खाण्यापिण्याचे जीवन जगण्यापेक्षा मृत्यू श्रेयस्कर पराजयाचे जिणे जगण्यापेक्षा रणमैदानावर मरणे चांगले."

"एकाग्रता हाच ज्ञानप्राप्तीचा एकमेव उपाय आहे. कोणतेही कार्य असो, मनाची एकाग्रता जितकी अधिक तितके ते काम चांगल्या प्रकारे होईल."

● स्वामी विवेकानंद ●

# हुंडाबळी समस्या व उपाय

कु. वाबळे राजश्री नारायण
एस्.वाय्.बी.ए



हुंडा हा शब्द उच्चारला की असे वाटते हा एक राक्षसी शब्द आहे. हुंडा म्हणजे विवाहात वराकडे देण्याचे एक मोठे संपत्तीसाधन आहे. पूर्वीच्या काळामध्ये विवाहाची असली पध्दती प्रचलित नव्हती. अपहरणविवाह, गांधर्वविवाह, अशा प्रकारच्या अनेक पध्दती विवाहाच्या होत्या. परंतु आजच्या कली युगात मात्र हुंडा देणे-घेणे. विवाह अशी पध्दत रुढ झालेली आहे. हुंडा घेणे-देणे हे कायद्याने गुन्हा असून सुध्दा हुंडा दिला जातो व घेतला जातो.

'जन्माला आलेला माणूस हा कधीतरी मरणार असतो. परंतु मरण हे कोणाला कसे येते ही काही सांगता येत नाही. परंतु हल्लीच्या युगात तर मरण हा प्रकार खूपच वेगळा झालेला आहे. दररोजची वृत्तपत्रे जर चाळली तर आपणाला कितीतरी आत्महत्येच्या बातम्या वाचायला मिळतात. एखाद्या वेळेस दुसरी बातमी कमी असेल परंतु आत्महत्यांच्या बातम्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात असते. आत्महत्या करण्याची कारणेसुध्दा प्रत्येकाची वेगळी असतात. अपयशं, असमाधान, अविवेक याच्या कात्रीत सापडलेले लोक आत्महत्या करतात. स्त्रियांच्या बाबतीत सतीची चाल जरी बंद झालेली असली तरी त्याही पेक्षा भयानक मरणाला आजच्या स्त्रीला सामोरे जावे लागत आहे. व हे मरण म्हणजे हुंडाबळी. समाजात आज हुंडाबळीच्या संख्येत सतत वाढ होत आहे.

'लग्न म्हणजे एक प्रकारचा बाजार आहे, असे मला तर वाटते. या बाजारात मुलांचे वडील आपल्या मुलांची विक्री करत असतात. या बाजारात मुलीला स्वयंपाक येतो ? तिला कशाचा छंद आहे ? तिचे शिक्षण किती झाले आहे ? असे अनेक प्रश्न केलेले असतात. या बाजारात आपली मुलगी उतारवयाची असेल तर पैसा पाहिजे. यासाठी किती यातना सहन कराव्या लागतात याचा विचारच करायला नको।

'स्त्री ही एक उपभोग्य वस्तू मानली जाते, घरातील सर्व काम करण्याचा मक्ता फक्त स्त्रियांचा असतो. तिने दुसऱ्या कोणत्याच क्षेत्रात तिला वाव मिळत नाही. मुलींना लहानपणापासूनच दुय्यमस्थान दिलेले असते. तिला प्रत्येक वेळी बजावले जाते की तुला दुसऱ्याच्या घरी जायचे आहे. असे वागू नको. इकडे जावू नये, अशा प्रकारची अनेक बंधने तिच्यावर लादली जातात. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्व, विकासावर मर्यादा पडतात. मुलगी किती जरी शिकलेली असली तरी पण तिच्या मनावर जे लहानपणापासून संस्कार आलेले असतात त्यात बदल होत नाही. परंतु मुलींनी या मुलांच्या इतकेच अधिकार आहेत हे दाखवून दिले पाहिजे. तरच या समाजातील लोकांच्या मनावर परिणाम होईल. परंतु मुलांना कुठल्याही गोष्टीला विरोध करण्याचे धाडस त्यांच्यामध्ये नसते. मुलीचे लग्न आहे हे तिला तिचे आई - वडील व नातेवाईक सांगत असतात, की आता सासर हेच तुझे घर आहे. त्याठिकाणी नीट राहाणे कोणाला उलट बोलू नये. कुठल्याही गोष्टीबद्दल तक्रार करायची नाही हेच तिला शिकवले जाते. परंतु तिने पण लक्षात ठेवले पाहिजे जसे आपल्या वडिलांचे घर आहे तसेच हे पण घर आहे. त्यामुळे मनातील भिती कमी होऊ शकते.

'जिस घरमें तेरी डोली जायेगी वहांसे
तेरी लाश भी निकलेगी''.

असे तिला वारंवार बजावले जाते. त्यामुळे स्त्री नवऱ्याच्या अत्याचाराविरुध्द आवाज उठवित नाही.

मुलगी लग्न होऊन पहिल्यादा घरी जाते त्यावेळी पासून तिचा छळ करण्यास सुरुवात होत असते मुलीला लग्नात दागिने घालतात. शिवाय मानपान तर रीतीप्रमाणे बाकी सर्व गोष्टी असतातच. हे सर्व देऊन सुध्दा तिचा छळ होतच असतो. कपडे, लत्ते, भांडी-कुंडी इ. नावाखाली नावे ठेवली जातात. 'असल्या साड्या आमची भांडीवाली सुध्दा घालीत नाही.' असे बोलून तिला त्रास दिला जातो. याकरिता मुलींच्या वडिलांनी आपल्या मुलीला खूप शिकविले पाहिजे. तिला नोकरी करण्याची संधी दिली पाहिजे. लग्नात, दागिने, भांडी असल्या वस्तू न देता साध्या पध्दतीने लग्न लावून दिले पाहिजे. परंतु भारतीय संस्कृति मध्ये लग्नाची पध्दत ही एक प्रतिष्ठेची बाब झाली आहे. पुढारी, समाजकर्ते असे लोक सुध्दा फक्त हुंड्याच्या विरोधी भाषण देतात आणि स्वतःच्या घरातील लग्न समारंभाच्या वेळी मात्र अतोनात खर्च करीत असतात. याला कोणीतरी विरोध केला पाहिजे त्यामुळे ही प्रथा बंद होईल.

मुली सर्व त्रास निमूटपणे सहन करीत असतात शिवाय तिला सांगितले जाते की जा तुझ्या बापाकडून पैसे घेऊन ये नाहीतर आमच्या घराची दारे तुझ्यासाठी बंद आहेत. अशावेळी मुलींना पण आईबापांनी आधार दिला पाहिजे ती स्वतःच्या पायावर उभी असेल तर तिला घाबरण्याची काहीच आवश्यकता नसते.

मुलगी माहेरी आली म्हटले की तू कशी आलीस, एकटीच का आलीस, असे नानाविध प्रश्न तिला विचारले जातात. ती मुलगी सुरुवातीला काहीच सांगत नाही. तिने जरी सासरची परिस्थिती सांगितली तरीसुध्दा तिचे कोणी ऐकत नाही. उलट तिलाच सांगतात की तुला काय पाहिजे ते सांग ते आम्ही तुला देतो. परंतु तू तुझ्या घरी जा इथे राहणे चांगले नाही. लोक नांव ठेवतात. लोकांच्यासाठी हे आपल्या मुलीचा विचार न करता तिला सासरी पाठवीत असतात.

लोकांच्या मागण्या काही कमी होत नसतात. सासरच्या लोकांकडून तिला अक्षरक्षः रॉकेल ओतून जाळले जाते. तरीसुध्दा सासरच्या लोकांना काहीच शिक्षा होत नाही. किंवा कसलाच प्रकारचा त्रास होत नाही. न्याय हा मिळविला पाहिजे जरी आपली मुलगी मेली तरी पण आपण धडा शिकविला तर दुसऱ्या मुलींना तरी त्रास होणार नाही. असा जर विचार केला तर हुंड्यासाठी ज्या मुली मरतात त्या मरणार नाही. हुंडाबळी होणार नाही. स्त्रियांनी हुंडाबळी विरुध्द आवाज उठविला पाहिजे 'बळीची बकरी' बनू नये तरच हुंडाबळीचे प्रमाण कमी होईल.

संस्कृतीने स्त्रीला जन्मापासून एक मानसिक वैचारिक अपंगत्व बहाल केले आहे. स्त्रिया या अन्यायाविरुध्द दाद मागण्यात अजूनही असमर्थ आहेत. पण तरीसुध्दा स्त्रिया मोर्चे काढतात. हुंडेशाही मुर्दाबाद अशा घोषणा त्यामध्ये असतात. परंतु याकडे लक्ष दिले जात नाही. समाजाने हुंडा देणे व घेणे हा आपला जन्मसिध्द हक्क नसून तो देशावरील कलंक आहे. देशातील बेकारी वाढीचा आधार आहे व तो आपण नष्ट केला पाहिजे असे साहसी धोरण स्वीकारले पाहिजे. माणूस - दुसऱ्यांच्या सुखासाठी जगत असतो. माणसाला फार थोड्या गोष्टीची आवश्यकता असते. परंतु माणसाला जास्त पैशाचा हव्यास असतो.

ह्या कलियुगात हुंडा ही समस्या अतिशय बिकट झालेली आहे तो एक प्रकारचा संसर्गजन्य रोगच होऊन बसला आहे, आणि तो दिवसेंदिवस वाढतच आहे. या रोगाचे अजून 'डॉक्टर' तयार झालेले नाहीत 'हुंडा देणे-घेणे यात प्रत्यक्षपणे माणसांची खेदी-विक्री आहेच. हुंडा घेणारा पुरुष खरे पाहता स्वतःला विकत असतो. तो मनुष्यप्राणी जीवनाचा उपयोग जीवनातल्या समस्या सोडविण्याकरिता करू शकतो. त्या मनुष्याच्या दृष्टीने हे मानवीजीवन म्हणजे एक अत्यंत मौल्यवान वस्तू आहे. असा जर प्रत्येकाने विचार केला तरच हुंडा या भयानक राक्षसाचा नाश होऊ शकेल आणि समाजात अत्याचाराला आळा बसेल आणि हुंड्याची समस्या ही कायमची नष्ट होऊ शकेल असे मला वाटते.

* * * *

"Education means all side developments out of the best in man-body - mind and spirit."
"शरीर, मन आणि आत्मा यांची सर्वांगिण उन्नती म्हणजे शिक्षण."

"विश्व हे अवाढव्य कुटूंब आहे व परमेश्वर हा ह्या कुटुंबाची कार्यधुरा धारण करणारा अक्षय, अनंत व सर्वशक्तिमान् धुरीण आहे."

"क्रांती कशाने विजयी होते ?
क्रान्त्या ह्या गणिततल्या बेरीज-वजाबाकीने चालत नसतात. त्या हृदयातील अवसानाच्या अतर्क्य बलाने विजय पावतात."

● वि. दा. सावरकर ●

# स्त्री-पुरुष समानता हीच खरी स्त्रीमुक्ती

भांडवलकर एम.एम
एम्.कॉम.पार्ट-१



१९७५ साल हे जगभर स्त्रीमुक्ती वर्ष म्हणून साजरे केले गेले आणि आता दरवर्षी ८ मार्च हा महिला दिन म्हणून पाळला जात आहे. खरोखरच प्रश्न असा निर्माण होतो की हे सर्व कशासाठी केले १ तेव्हा कांहीजण म्हणतात की स्त्रियांवर जो अन्याय होत आहे त्याच्यावर प्रकाश टाकण्यासाठी हा सर्व खटाटोप. स्त्री-पुरुष समानता निर्माण व्हावी हा त्याच्या पाठीमागचा मुख्य उद्देश. खरोखरच या प्रश्नाच्या उत्तरावर हसू येत. कारण आज स्त्रियांवर जो अन्याय होत आहे त्याचे निर्मूलन झालय ? स्त्री-पुरुष समानता आलीय ?

हिंदू धर्मात वैदिक कालखंडाला सुवर्णयुग नावाने संबोधले जाते. या काळात स्त्रियांना जितका मान होता तितका त्यानंतरच्या काळात कधीच मिळालेला दिसत नाही. वैदिक काळातील स्त्री खऱ्या अर्थाने 'गृह-स्वामिनी' होती, असे म्हटले तर त्यात कांही वावगे ठरणार नाही. वैदिक काळातील विवाह हे प्रौढ विवाह होते. कारण त्याकाळी विवाहापूर्वी मुलीने शिक्षण पूर्ण करणे आवश्यक मानले जाई. त्याशिवाय ती विवाहास योग्य होत नसे. तात्विक चर्चेत, यज्ञकर्मात, राजकारभारात ती पुरुषांच्या बरोबरीने भाग घेवू शकत असे. पुरुषांच्या बरोबरीने तिलाही स्थान होते. तिलाही ज्ञानी मानले जाई. 'हुंडा' हा प्रकार त्याकाळी नव्हता. समानता होती. स्त्री राजकारभार चालवीत असे. याचे उदाहरण द्यायचेच झाले तर रामायण, महाभारत आहे.

त्याकाळी स्त्रियांना ज्या पध्दतीने वागणूक दिली जात होती ती वागणूक आज दिली जात आहे काय ? स्त्री पुरुष समानता आहे काय ? रामायण, महाभारत वाचणं, ऐकणं, पहाणं आजच्या लोकांना नुसत आवडतय. पण त्याचे अनुकरण करणे, आचरण करणे, प्रत्यक्ष जीवनांत ते वापरणं मात्र आजच्या लोकांनी जमतं नाहीये. आणि हीच खरी स्त्री पुरुष समानतेची फार मोठी शोकांतिका आहे.

स्त्रीला प्रत्येक काळात व समाजात दुय्यम स्थान होते व आहे. एक पुरुष अनेक स्त्रियांशी विवाह करु शकतो परंतु विधवा किंवा स्त्री अनेक पुरुषांशी विवाह करु शकत नाही. पुरुष अनेक स्त्रियांशी विवाह करु शकतो परंतु विधवा अनेक पुरुषांशी विवाह करु शकत नाही हे कोणत्या संस्कृतीत बसते? त्या संस्कृतीच नाव काय आहे ?

ब्रिटीशांच्या आगमनाने महर्षी धोंडो केशव कर्वे, म.फुले, मं.गांधी, आगरकर या समाजसुधारकांनी समाजात जागृतीची पावले उचलली व उत्क्रांतीच्या मार्गाने हळूहळू शिक्षणांचा प्रसार होऊ लागला. स्त्रीला जागी करु पाहणारी चळवळ जिवंत होऊ लागली.

आज स्त्री मुक्तीच्या संघटना निघत आहेत. स्त्री पुरुष समानतेच्या घोषणा दिल्या जात आहेत. समाजाकडून स्त्री पुरुष समानतेची मागणी केली जात आहे. भारतीय स्त्री जागृत झाली आहे. असे म्हटले जात आहे पण ती कोणत्या थरातील स्त्री जागृत झाली आहे तर ती मध्यम वर्गातील व शहरी भागातील. ही चळवळ फक्त शहरातच रेंगाळत राहिलेली आहे. स्त्री पुरुष समानतेच्या चळवळीची खरी गरज आहे ती शहरातील झोपडपट्ट्यात, ग्रामीण भागात. आजही खेड्यातील स्त्री गंडा, दोरा, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, प्रथा चालीरीती यांना चिकटून राहिलेली आहे. आधुनिकपणाची, नाविन्याची धग झोपडपट्ट्यापर्यंत व ग्रामीण भागापर्यंत पोहोचलेली नाही ही खरी स्त्री पुरुष समानतेची दुखणी आहेत.

स्त्री जागृत होत असली तरी पुरुष अजून त्याप्रमाणे जागृत झालेला नाही. त्यामुळे ही स्त्री पुरुष समानता एकांगी स्वरुपाची आहे. त्यासाठी पुरुषांनी बदल स्वीकारला पाहिजे.

आज जी स्त्री पुरुष समानता आहे ती फक्त आर्थिक क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. कागदोपत्री स्त्रीमुक्ती व स्त्रीमुक्ती समानता यशस्वी झालेली आहे आणि हेच स्त्री-पुरुष समानतेचे खरे ठळक दुखणे आहे.

सामंजस्याने व योग्य विचाराने पावले उचलावीत तरच, समाज जागृती होऊ शकेल. स्त्रीला स्त्रीच स्थान मिळण्यासाठी प्रयत्न व्हायला हवा. तरच खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता होऊ शकेल.



# पतंग

श्री. सचिन दत्तात्रय पटवर्धन
द्वितीय वर्ष विज्ञान



आकाशात पतंग उडत होता. नेहमी पतंगांनी भरलेले आकाश मात्र आज मोकळेच होते. उडत होता फक्त तो एकटाच. त्याचा लालसर रंग खुलत होता. आकाशाला खुलवीत होता. आकाशात त्याचीच छाया पडली होती. अस्ताला जाणारा सूर्य कुठेतरी समुद्रात डुबत होता. शांत झालेली निसर्गाची शाळा खट्याळ वारा अशांत बनवीत होता. खुल्या विहाराच्या आनंदात पतंगही दंग होता. पतंगाला बांधलेल्या शेपटीची सळसळ पतंगाचा अस्थिरपणा सर्वकाही वाऱ्याचाच खेळ होता. झाडांच्या अस्तित्वामुळे वाराही फुलत होता. सुगंधाच एखादं रोपटं वाऱ्यामुळेच प्रकाशात येत होतं. ही सारी कृपा वृक्षाची. वृक्ष पाण्यावर वाढत होते. वाऱ्याला हालवत होते. म्हणूनच तर उडत होता तो लालसर पतंग आकाशात दिमाखाने.

कधी कधी उगीचच रागविणारे, कधी झोपेचं सोंग घेऊन दुसऱ्याला झोपविणारे, कधी ढगांना उगीचच मोठेपणा बहाल करणारे सूर्यराज आज अगदी आनंदात होते. अर्थात वाऱ्याच्या मुक्त संचारामुळे त्यांचा आनंद द्विगुणित झालेला पहायला मिळत होता. पतंग मात्र वेगळाच होता. या सर्वांमध्ये असून त्यामध्ये बसल्याचे तो भासवत होता. एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाताना त्याचा चेहरा नकळतच बदलत होता. वरून खाली येताना तो हिरमुसत होता. खालून जाताना त्याच्या शेपटीची होणारी सळसळ आनंद व्यक्त करीत होती. वरून खाली खालून वर सारखे हेलकावे खाऊन तो दमत होता. परंतु होणारी दमछाक तो विजयाच्या आनंदात विसरत होता. नाचत होता, बागडत होता. दुःखाच्या घडीला अनुभवाचे गाठोडे गोळा करीत होता. अश्रूंच्या सागरात पोहत होता. तहान भागविण्यासाठी त्याच सागराचा तो वापर करीत होता. घशाला पडलेली कोरड फक्त ओली करत होता. वेड्यासारखा राबत होता. खोट्या आशेला भुलत होता आणि मनाशीच म्हणत होता "जगणं हे असच असतं ह्याचचं नाव जीवन असं नाव असतं." झुरण्याला तो जगणं मानीत होता. अंधाराला जीवन म्हणत होता. दोरीच्या सत्यामुळे वाऱ्याच्या लहरीपणामुळे मध्येच घाबरत होता. खोट्या जीवनाकडे वेड्या सुखांकडे आसक्त नजरेने बघत होता. कधी तरी हे सारं संपणार आहे. दोरी मधूनच तुटणार आहे. वाराही वहाणे थांबविणार आहे हे सत्य सांगणाऱ्या मनाला सारं काही माहित असूनही उगीचच गप्प बसवीत होता आणि मनाशीच सुटकेचा निःश्वास टाकत होता. वाऱ्याचा खट्याळपणा, दोरीचा नाजुकपणा ह्या सर्वांचा परिचय करून घेण्यात पतंग दंग होता. आकाशात उडण्याचा हा नवा अनुभव नियतीने ठरविलेल्या कालचक्राशी सतत बांधलेला होता, आहे आणि असतो हे सत्य जाणून घेत असताना त्याचा लाल रंग हळूहळू उतरत होता. स्वतःच्या अस्तित्वाची ओळख जनतेला करून देण्यामध्ये तो व्यग्र होता. परंतु ही ओळख जनतेला जेव्हा पटेल तेव्हा आपण असू किंवा नसू याची चिंताही त्याला त्रस्त करीत होती.

पतंग आपल्याच विचारात मग्न होता. विचारांचे हेलकावे उंच उडण्याची जिद्द बाळगून होता. परंतु नियती मात्र एक वेगळेच षड्यंत्र रचीत होती. पतंगाला याची चाहुलही नव्हती. दोरीचे हेलकावणे सुरु होते. मधूनच खट्याळ वारा शांत होई आणि मधूनच तो जोराने वाहू लागे. वारा शांत होताच पतंग घाबरू लागे.

दोरी मात्र या सर्वांहून वेगळी होती. स्वतःच्या अस्तित्वावर पतंगाचे अस्तित्व आहे हे जाणून स्वतःच स्वतःवर खूष होती. पतंग आणि नियंत्रक यामधील ती दुवा होती. दोरीचा रंग कुठे पांढरा तर कुठे काळा होता. स्वतःच्या सप्तरंगांच्या अभिमानाची झाक दोरीच्या डोळ्यात लपत नव्हती. वाऱ्याप्रमाणे दोरी हेलावीत होती. नियंत्रकाच्या हालचाली दोरीमार्फतच पतंगापर्यंत पोहचत होत्या. पतंग वाऱ्याबरोबर दोरीचाही दास होता. तरीसुद्धा स्वतःला स्वतंत्र मानीत होता.

नियंत्रक हे नाटकातले महत्वाचे पात्र होते. नियंत्रक खेळ खेळीत होता. पतंगाला नाचवीत होता. श्रेय मात्र वारा आपल्याकडे

घेत होता. दोरीसुद्धा त्याच्याच हातात होती. तो दोरीचा देखील निर्माता होता. दोरी आधी त्याने पतंग बनविला होता. त्यानंतर त्याने तो सजवीला होता.. म्हणजे तो नियंत्रकाबरोबर निर्माताही होता. हा सर्व त्याचाच खेळ होता. पतंगाच्या दुःखाकडे आनंदाकडे तो समान दृष्टीने पहात होता. तो आनंदातही हसत होता, दुःखातही हसत होता. पतंगाच्या रडण्यालाही तो हसत होता. पतंगाच्या अस्तित्वाची पतंगाच्या भूतकाळाची पतंगाच्या भविष्याची मदार त्याच्यावरच होती. पतंग हे जाणून होता. त्याला खूष करण्यासाठी निरनिराळे उपासना मार्ग हुडकीत होता. पतंगाच्या दोन कोनांना जोडणारी सरळ काठी दोन कोन जोडलेल्या वक्र काठीकडे पाहून नम्रता शिकण्याचा प्रयत्न करीत होती. कागद फाटला तर काठ्यांच्या अस्तित्वाला अर्थच नव्हता. काठी तुटली तर कागद पतंग रहाणारा नव्हता, फक्त तो भरकटणार होता. वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर वहात जाणारा होता. कुठेतरी कचरा म्हणून सडणार होता. आत्म्याबरोबर शरीरही भयभीत होते. पण एकमेक एकमेकांना सारखे समजावीत होते, मृत्यू अटळ आहे. मग त्याचे भय कशाला. वारा स्वतःला अमर मानीत होता. अर्थात वाऱ्याच्या अमरत्वात पतंगजातीचे अमरत्व दडले आहे. हा लालसर पतंग जाईल पण आकाश पतंगानी भरलेलेच असेल. निळा, पिवळा, हिरवा, भगवा, पट्ट्यापट्ट्यांचा, पांढरा, निरनिराळ्या चक्रांनी चिन्हे असलेला, निरनिराळ्या सभ्यतांचा मार्गदर्शक असलेला, अभिमान असलेला पतंग आकाशात उडतच राहिल. स्वतःच्या अस्तित्वाशी झगडत, दुसऱ्या पतंगाशी काटाकाटी खेळत कधी स्वतःशीच विरक्त बनत पण यातलं काहीही स्वतःशीच विरक्त बनत पण यातले काहीही स्वतःच नसताना त्याच्याचसाठी झुरत, स्वतःलाच नियंत्रक मानत नियतीशी विद्रोह करत उडत होता. लालसर पतंग इतरांप्रमाणे भांडत होता, उंचीसाठी सगळेच भांडतात म्हणून.

दोरी वाऱ्याबरोबर हेलकावीत होती. या हेलकावण्यात प्रत्येकक्षणी एक आग धुमसत होती अधिकाराची. पतंग वाऱ्याला आणि दोरीला मदतनीस मानीत होता. पण इथे मात्र अपवाद होता. एकालाच मदत करणारे मित्र आपापसात मात्र शत्रू होते. माझा अधिकार जास्त की तुझा अधिकार जास्त याची सिद्धता शोधण्यात दंग होते.

एक दिवस भांडणाला तोंड फुटले. वारा आणि दोरी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करू लागले. पतंगाचे मित्र पतंगाचे नकळतच शत्रू बनले. भांडत होते ते परंतु जळत होता पतंग त्या आगीत. वाऱ्याने ढगांचे शस्त्र वापरले. पतंग भिजून गेला. दोरीच्या आततायी वृत्तीमुळे झाडांच्या काट्यांनी त्याला विदीर्ण केले.

नियंत्रक पहात होता. पतंगाचे शरीर फाटता फाटता फाटत होते. पतंगाचा आत्मा भुर्रदिशी उडून गेला. नियंत्रकाकडे त्याला पिंजऱ्यात बंद केले. नियंत्रक निघून गेला.

खाली उरला फक्त फाटका कागद. तुटलेल्या काठ्या आणि निःसहाय्य होऊन पडलेली दोरी. सगळेच निर्जिव होते. वारा फक्त अपवाद होता. सजीव असून तो निर्जिव होता. स्वतःच्याच वर्तनाला स्वतःच दोष देत होता.

इतक्यात, वारा सजीव झाला. दोरी पुन्हा हेलकाऊ लागली. कागद सांधला गेला. तुटलेल्या काठ्या कतंगाशी बोलू लागला. पुन्हा पतंग दिमाखाने डोलू लागला. यावेळी दोरी आणि वारा फसणार नव्हते. भांडणार नव्हते. वाऱ्याने दोरीची मैत्री केली हे पाहून सूर्यराजांना आनंद झाला. नियंत्रकही स्वतःचे काम चोखरीतीने पार पाडू लागला. सगळीकडे आनंदी आनंद झाला.

✻ ✻ ✻ ✻

'जर तुम्हाला स्वतंत्रतेबद्दल आणि तुमच्या देशाबद्दल प्रेम असेल तर ज्यांनी स्वतंत्रता आणि देश यांचा नाश केला त्यांच्यापासून दूर राहा. जे तत्वज्ञान तुम्हाला जडवाद आणि निरीश्वरवाद एक नवा सिद्धांत म्हणून शिकवते. त्याच्यापासून दूर राहा. थोर माणसे आणि महान वस्तूना पूज्य माना.

● (फ्रेंच तत्त्वज्ञ - व्हिक्तोर कुझाँ) ●



# नदीचे आत्मवृत्त

जाधव बी. डी.
एस्. वाय. बी. ए.



रामप्रहरीच मी स्नान करण्यासाठी नदीवर निघालो होतो. मनात विचार आला. 'आपल्याला नदी बोलली तर ... मी नदीच्या तिरावर जाऊन कपडे काढले आणि पाण्यात उडी मारणार तोच आवाज आला, राम ! मी आजूबाजूला चहूबाजूला पाहिले, पण कोणीही दृष्टीस पडेना. मी त्याकडे दुर्लक्ष केले थोड्यात वेळात दुसरीही हाक ऐकू आली 'अरे राम ! माझ्याकडे बघाना काय चमत्कार माझ्याबरोबर खरोखरच नदी बोलू लागली. आणि मी ऐकू लागलो.

अरे राम ! तू किंवा तुझ्यासारखी कित्येक माणसं माझ्याकडे येतात-जातात पण माझी कधी विचारपूस केली की मी कोठून आले ? माझा जन्म कुठे झाला ? मी तुमच्यापर्यंत कशी कशी आले ? पुढे कुठे जाते ? कोणत्या समुद्राला मिळते? सांग केला का कधी विचार ? अरे मलाही तुमच्यासारखा जीव आहे, मन आहे, अपेक्षा आहेत त्यांच्याकडे तुम्ही लोकांनी कधी पाहिलं आहे का ?

राम, माझा जन्म भिमाशंकराच्या डोंगरात झाला. तेथील तपश्चर्येसाठी बसलेल्या शंकराच्या जटेतून मी लहान प्रमाणात जन्माला आली. त्या भिमाशंकराच्या डोंगरातून वहात वहात खाली येते. म्हणूनच मला 'भीमा' हे नाव पडले आहे. मला अनेक ओहोळ मिळून माझे रुपांतर ओढ्यात होते. हळूहळू मोठे रुप मला मिळते. तशीच मी काही ठिकाणी नागमोडी तर काही ठिकाणी सरळ तर काही ठिकाणी पूर्ण वळण वळण घेत तुमच्या पर्यंत पोहोचते. कारण मला नवनवा प्रदेश पहायचा आहे, आनंदाने बागडायचे आहे, खळखळपणे धावायचे आहे तर एखाद्या निसर्ग कविला आनंद द्यायचा आहे आणि भाविक भक्तांच्या भेटी घ्यावयाच्या आहेत. पण मला मानवांचा स्वार्थीपणा माहित नव्हता.

In modern times all these things have changed because the concept of a library has also changed and it is taken care to see that the collection of books is used. Dr. S. R. Ranganathan, who is hailed as the father of Library science in India, has laid down five principles of library science on which the whole concept of modern library stands. The principles are known as 'The Five Laws of Library Science.' They are as under :

1. Books are for use
2. Every reader his/her book
3. Every book its reader
4. Save the time of the reader
5. Library is a growing organism.

1. **Books are for use :** Books and other reading material must be used by the reader. For this, the location of the library must be in the midst of people or reader. It must be a suitable place for the reader. The timings of the library must be convenient to the reader. It is criminal to keep the library closed, when there are readers in the library. On public hilidays it should not be closed. The personality of the librarian should reflect the nature of the library. The librarian must be in a position to know the books. He must be well-qualified, scholarly, and always ready to expand his knowledge. He must be eager to help the reader. He must possess the ability to judge the psychology of the reader. Library rules should not be like a penal code, but rules must be hearty in nature.

2. **Every reader his/her book :** The library must be freely open to all readers, irrespective of age, profession, race, sex, colour. Books must be available for all. The people staying in a hospital must also be extended library service, for they can forget their ailment and pain for some time. This is known as 'bibliotherapy.' The criminals in prisons must also be issued books, except those books which deal with crime and its modus operandi. Likewise, children, women and old people must be given books as per their choice and wishes.

3. **Every book its reader :** This law is a companion or complement of the first law. Every book must be put into circulation, even those books which were purchased without selection. There are two types of access :- i) direct access, that is open access; (ii) closed access. 'Closed access' is that in which readers and reading material do not come into contact without the agency of library assistants. Modern library accepts the open access. In 'open access' readers are given freedom to go to the books directly and check the usefulness of the book, freely. There are some disadvantages of 'open access'. But, generally speaking, 'open access' fulfils the law that every book must get its reader.

4. **Save the time of the reader (and the staff) :** This principle is self evident. It saves the time

of staff as well. In modern times, time is valuable. So, to save everyone's time is our prime concern. In this principle, location of a library is very important. A Library should be centrally located. There should be open access in the library. There should be guide cards in various places relating to the subjects. By using all these, the reader can get his books immediately. By this way, the time of the reader and library staff will be saved.

**5. Library is a growing organism :** Books and other reading material are steadily on the increase in the modern age. With this kind of growth in the essential constituents of the library, the library has also grown. The library and its growth is similar to that of a living organism. A library, like a living organism, grows physically and mentally. provision must be made for a separate building for the library without changing basic structure or pattern. There must be provision for increase in classification, cataloguing etc., There must be flexibility in these respects. These things will necessitate increase in library staff. In short, library is a growing organism.

According to Dr. Ranganathan the aforesaid laws or principles are of great significance in a modern library. The very concept of Modern Library rests on these five laws.

❊ ❊ ❊ ❊



## Mathematics

When people say that Maths is bad,
I feel very sad;
Sums in Maths can be solved faster than mail,
I don't know why in Maths many fail;
Perhaps they don't know addition and subtraction,
Which is their own dereliction;
I feel Maths is very easy,
Those who think otherwise are very lazy;
Maths is in all subjects including Physics and Chemistry,
But I wonder why students like History;
Maths is a subject that aims at excellence,
And those who perfect Maths excel in brilliance.

**Miss Manisha Misal**
**F.Y.B.Sc.**

❊ ❊ ❊ ❊

## When the Heart is Full

A silence pregnant with speech
in my heart reigns,
A speech clamouring for words
my heart suffuses,
A cluster of melodious words
yields sweet verse;
but ...
As the verse my lips does reach,
It vanishes, powerless to be born;
But again ...
Into a dream has my mind lapsed,
Into the recesses of a world to be born,
Into the bowers of love has it entered,
To quicken the heart to vibrate in love,
But alas ...
Love, I can feel and experience,
But, express, I cannot :
When the heart is full,
Words do never escape

**Mr. A. M. Makhare**
**M.A. (English)**

❊ ❊ ❊ ❊



# जिमखाना अहवाल (वरिष्ठ महाविद्यालय)

१. आयोजित क्रीडा स्पर्धा :सन १९९१-९२ या वर्षात खालील विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

१. आंतरविभागीय बॅडमिंटन (मुले/मुली) स्पर्धा
२. आंतरविभागीय कबड्डी (मुले) स्पर्धा
३. आंतरविभागीय खो-खो (मुले-मुली) स्पर्धा
४. आंतरविभागीय क्रिकेट (मुले) स्पर्धा
५. आंतरमहाविद्यालयीन मैदानी (मुले/मुली) स्पर्धा
६. आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब (मुले) स्पर्धा
७. आंतरमहाविद्यालयीन वजन उचलणे व शरीर सौष्ठव स्पर्धा

२. पुणे जिल्हा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा मधील महाविद्यालयाचे विजयी व उपविजयी संघ

| संघ | विजयी/उपविजयी |
|---|---|
| १. कबड्डी (मुली) | विजयी |
| २. खो-खो (मुली) | विजयी |
| ३. हॅण्डबॉल (मुले) | उपविजयी |
| ४. बास्केटबॉल (मुली) | उपविजयी |
| ५. बॅडमिंटन (मुली) | उपविजयी |
| ६. कबड्डी (मुले) | उपविजयी |
| ७. बुद्धीबळ (मुले) | उपविजयी |
| ८. मल्लखांब (मुले) | उपविजयी |
| ९. कुस्ती ६८ किलो वजन गट | विजयी प्रथम क्रमांक |
| १०. वजन उचलणे ६० किलो गट | विजयी प्रथम क्रमांक |
| ११. वजन उचलणे ७५ किलो वजन गट | प्रथम क्रमांक |
| १२. शरीर सौष्ठव ६५ किलो वजन गट | प्रथम क्रमांक |
| १३. शरीर सौष्ठव ७० किलो वजन गट | प्रथम क्रमांक |
| १४. शरीर सौष्ठव ७५ किलो वजन गट | प्रथम क्रमांक |

३. पुणे जिल्हा क्रीडा विभागाकडून महाविद्यालयाचे निवड झालेले खेळाडू :

| | |
|---|---|
| १. हॅण्डबॉल (मुले) | ३ |
| २. बॅडमिंटन (मुले) | १ |
| ३. बॅडमिंटन (मुली) | १ |
| ४. कबड्डी (मुली) | ५ |
| ५. कबड्डी (मुले) | २ |
| ६. व्हॉलीबॉल (मुली) | १ |
| ७. बास्केटबॉल (मुली) | ४ |
| ८. बास्केटबॉल (मुले) | २ |
| ९. कुस्ती | १ |
| १०. मल्लखांब | १ |
| ११. मैदानी स्पर्धा (मुले) | २ |
| १२. मैदानी स्पर्धा (मुली) | ६ |
| १३. वजन उचलणे (मुले) | ३ |
| १४. शरीर सौष्ठव (मुले) | ३ |
| १५. खो-खो (मुली) | ७ |

४. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचे निवडलेले खेळाडू

| | |
|---|---|
| १. झुबेर शेख | २० किलो मीटर धावणे |
| २. कु. लिना प्रतापराव कदम | खो-खो |

५. विशेष अभिनंदन :

| | |
|---|---|
| १. कु. दिपाली कदम | पुणे जिल्हा बॅडमिंटन (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |
| २. कु. सुनिता जाधव | पुणे जिल्हा कबड्डी (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |
| ३. कु. शर्मिला कुलकर्णी | आंतरविभागीय खो-खो (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |

**प्रा. वाय. डी. देसले**
**शारीरिक शिक्षण संचालक**

❊ ❊ ❊ ❊

# जिमखाना अहवाल
## (कनिष्ठ महाविद्यालय)

**आयोजित क्रीडा स्पर्धा :** सन १९९१-९२ या वर्षात कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले.

तालुका पातळीवर आंतरशालेय कबड्डी, खो-खो, कुस्ती, व्हॉलीबॉल, टेबलटेनिस, या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले. या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचा कबड्डी (मुले) संघ विजयी झाला. तसेच गटपातळीवर चार तालुक्यांच्या स्पर्धा आमच्या महाविद्यालयाने आयोजित केल्या. या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचा कबड्डी संघ उपविजयी ठरला. या नंतरच्या पुढील आंतरशालेय गटपातळीवरील स्पर्धा आमच्या महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाल्या. त्यात आमच्या महाविद्यालयाने चॅम्पियनशिप मिळवली. या स्पर्धेत प्रामुख्याने खालील खेळाडू चमकले.

| | |
|---|---|
| १. कु. वैशाली बेलपत्रे | लांबउडी, रिले |
| २. कु. योगीता देशपांडे | १५०० मीटर धावणे, रिले |
| ३. कु. वृषाली मोरे | रिले |
| ४. कु. ज्योती खडकीकर | रिले |
| ५. श्री. पोपट जाधव | थाळीफेक |
| ६. श्री. शरद पिसाळ | हातोडाफेक |

वरील खेळाडूंची पुणे येथे झालेल्या आंतरशालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी कु. वैशाली बेलपत्रे हिने लांबउडीत प्रथम क्रमांक मिळवून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली व तिची सोलापूर येथे झालेल्या आंतरशालेय विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. जिल्हा पातळीवरील स्पर्धेत श्री. शरद पिसाळ याला द्वितीय क्रमांक मिळाला.

कु. वैशाली बेलपत्रे हिने सोलापूर येथे विभागीय मैदानी स्पर्धेत लांब उडीत प्रथम क्रमांक मिळवून विजयी घोडदौड कायम ठेवली व अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत निवड करण्यात आली. अमरावती येथे राज्यस्तरीय आंतरशालेय मैदानी स्पर्धेत लांब उडी मध्ये कु. वैशाली बेलपत्रे हिने प्रथम क्रमांक मिळवून आपली यशस्वी परंपरा राखली व या उज्ज्वल यशामुळे तिची दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरशालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या तिच्या यशाबद्दल महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर कौतुक झाले. महाविद्यालयाच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट ठरलेली आहे. खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

प्रा. एस्. बी. इंगवले, शारीरिक शिक्षण संचालक

# राष्ट्रीय सेवा योजना

**विद्यार्थी संख्या : २००**

**उद्घाटन :** दिनांक १५ ऑगस्ट १९९१ रोजी उपप्राचार्य डॉ.के.एम्.सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली व साप्ताहिक स्फूर्तीचे संपादक श्री. अनिल गलांडे यांच्या शुभहस्ते उद्घाटन समारंभ संपन्न झाला. त्यादिवशी महाविद्यालयाच्या परिसरांतील गाजर गवत निर्मूलन करून श्रमदानास सुरुवात केली.

**सद्भावना फेरी :** स्व. राजीव गांधी यांच्या स्मृति जन्मदिनानिमित्त २१ ऑगस्ट १९९१ रोजी बारामती शहरातून सद्भावना फेरीचे आयोजन केले. नागरिकांमध्ये विविध घोषणाफलकांद्वारे एकात्मता व परस्पर सामंजस्याविषयी महत्त्व पटवून देण्यात आले. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांच्या अध्यक्षतेखाली व नगराध्यक्ष विनोद्कुमार गुजर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**राष्ट्रीय एकात्मता मोहीम :** २३ ऑगस्ट १९९१ रोजी राष्ट्रीय एकात्मता मोहिमेचा शुभारंभ ब्रिगेडिअर जी. चंद्रमणी, डायरेक्टर, इन्स्टिट्युट ऑफ नॅशनल इंटिग्रेशन यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्लाईडस् दाखवून माहिती दिली.

**साक्षरता दिंडी :** आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त ८ सप्टेंबर १९९१ रोजी बारामती ते कन्हेरी अशी २०० विद्यार्थ्यांची सायकल दिंडी आयोजित करण्यात आली होती. विविध घोषणाफलकाद्वारे तसेच रस्त्याच्या बाजूने घोषवाक्ये लिहून लोकांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. कन्हेरी येथील हनुमान देवालयाचा परिसर स्वच्छ करून विविध प्रकारच्या २५० रोपांचे वृक्षारोपण केले.

**प्रौढ शिक्षणसंघटक शिबीर :** दिनांक ३० ऑगस्ट १९९१ रोजी प्रौढ शिक्षण संघटक शिबीर संपन्न झाले. यात राष्ट्रीय सेवा योजनेतील १०० स्वयंसेवकांनी प्रशिक्षण घेतले.

**एक दिवसीय शिबिरे :** २९ सप्टेंबर १९९१ रोजी सावळ व उंडवडी (क.प.) या दत्तक गावात एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ग्रामसफाई, गाजरगवत निर्मूलन, तसेच शोषखड्डे घेण्यात आले.



**मादक द्रव्य विरोध दिन :** २ ऑक्टोबर १९९१ रोजी म. गांधी जयंती हा दिवस मादक द्रव्य विरोधी दिन म्हणून साजरा केला. 'नशाबंदीची गरज' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना रोख स्वरुपात बक्षिसे देऊन उत्तेजन दिले.

**विशेष उन्हाळी शिबीर :** दिनांक २९ जून ते ३० जून १९९० या काळात मौजे उंडवडी (क.प.) येथे विशेष उन्हाळी शिबीर आयोजित करण्यात आले होते. भैरवनाथ शिक्षण मंडळाच्या मालकीच्या जमिनीत ५००० खड्डे घेऊन साग, निलगिरी, चिंच, सुरु इत्यादी रोपांची लागवड करण्यात आली.

**विशेष हिवाळी शिबीर :** दिनांक ३ डिसेंबर ते १२ डिसेंबर १९९१ या काळात मौजे-सावळ येथे १०० विद्यार्थ्यांचे विशेष हिवाळी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रम अधिकाऱ्याच्या पुढाकाराने ग्रामसभा बोलावून केवळ एका तासात ५०००/- रु. जमा करून त्यातून प्राथमिक शाळेला फरशी, बागेसाठी काटेरी कुंपण तयार केले व स्थायी स्वरुपाचा २०,०००/- रु. किमतीचा बंधारा श्रमदानातून उभारला.

### ग्रामसफाई, श्रमदान इत्यादी

महाविद्यालय परिसरांत नियमित कार्यक्रमांतर्गत ग्रामसफाई व श्रमदानाचे कार्यक्रम आयोजित करून त्यामधून महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ राहण्यास मदत केली आहे. श्रमदानातून नर्सरी रस्ता, कॉलेज क्रीडांगणावरील गाजर गवत निर्मूलन इत्यादी उपक्रम पार पाडले.

गटप्रमुख :

| | |
|---|---|
| १. श्री.गणेश खलाटे | २. श्री.इब्राहिम इनामदार |
| ३. श्री.शशिकांत सकटे | ४. श्री.अच्युत शिंदे |
| ५. श्री.अर्जुन वणवे | ६. कु.शुभांगी भोसले |
| ७. कु.शुभांगी रसाळ | ८. कु.शुभांगी गिरंजे |

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे युवा नेतृत्व

| दिनांक | उपक्रमाचे नांव व आयोजन | लीडर्सचे नांव |
|---|---|---|
| १६/७/९१ ते २५/७/९१ | नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प,बदामी, धारवाड विद्यापीठ, कर्नाटक यांच्यावतीने | १. श्री. वणवे अर्जुन शिवाजी टी.वाय.बी.एस्सी. |
| १९ ऑक्टो. ९१ ते २३ ऑक्टो. ९१ | मळे राजगड रायरेश्वर केंजळगट - पदभ्रमण कॅम्प भोर महाविद्यालयाच्या विद्यमाने | १. श्री. महामुनी पोपट रामचंद्र एस.वाय.बी.ए. |
| २१ ते ३० डिसेंबर ९१ | विद्यापीठ स्तरीय एन.एस.एस. कॅम्प पाचेगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर नेवासा कॉलेजच्या विद्यमाने | १. श्री. खलाटे गणेश नामदेव एफ.वाय.बी.ए |
| २५/१२/९१ ते २९/१२/९१ | जिल्हा स्तरीय शिबिरांसाठी पुरंदर कॅम्प. सासवड महाविद्यालयाच्या विद्यमाने | १. श्री. जाधव अजय शिवाजी, एस.वाय.बी.कॉम, २) श्री. गावडे अनिल शंकरराव, एस.वाय.बी.ए. |
| ५/१/९२ ते ९/१/९२ | जिल्हा स्तरीय मुलींचे शिबीर खंडाळा, लोणावळा कॉलेजच्या विद्यमाने | १) कु. कुलकर्णी वैशाली वासुदेव, एस.वाय.बी.ए. २) कु. गिरंजे शुभांगी रामदास, एफ.वाय.बी.कॉम. |
| १७/१/९२ ते १८/१/९२ | युवक नेतृत्व विकास शिबीर, बी.एम.सी.सी. कॉलेज, पुणे | १. कु. अग्रवाल मनिषा हिरालाल, एस.वाय.बी.कॉम, २. श्री विरकर, एस.वाय.बी.एस्सी |

| | | |
|---|---|---|
| १७/१/९२ ते १९/१/९२ | विवेकानंद स्मृति सप्ताहानिमित्त युवक विकास शिबीर चाकण महाविद्यालय, चाकण जि. पुणे | १. श्री. महेश वावळे, २. कु. सिंधू पवार ३. श्री. किरण भोसले ४. श्री. अच्युत शिंदे, ५. श्री. संजय पवार ६. कु. मंजुषा खोचरे ७. कु. शुभांगी भोसले, ८. कु. शुभांगी रसाळ, ९. कु. बेबी ढवळ, |

प्रा. आर. के. खाडे,
प्रा. के. एस. ढमाळ,
कार्यक्रमअधिकारी.

## राष्ट्रीय छात्र सेना

छात्र संख्या - १६०

| (अ). कार्यक्रम | स्थळ | दिनांक |
|---|---|---|
| स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन मानवंदना | महाविद्यालय | १५/८/१९९१ २६/१/१९९२ |
| वृक्षारोपण | महाविद्यालय | १५/८/१९९१ |
| वार्षिक फायरिंग | वरवंड कॅम्प | २२ ऑक्टो. ते ३१ ऑक्टो. १९९१ |

(ब). छात्र सैनिकांचा विशेष सहभाग

| | |
|---|---|
| १. श्री. राजेंद्र लक्ष्मण जराड अंडर ऑफिसर | -ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प - स्वांगपिंडारी कॅम्पमध्ये सहभाग (उत्तर प्रदेश - हिमालय पर्यंत) दि. १५ मे ते ११ जून १९९१) |
| २. श्री. गणपत रघुनाथ भिसे कार्पोरल | -ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प - स्वांगपिंडारी कॅम्पमध्ये सहभाग (उत्तर प्रदेश हिमालय पर्वत) दि. १५ मे ते ११ जून १९९१) |
| ३. श्री. प्रकाश केरबा वाघमोडे अंडर ऑफिसर | वार्षिक प्रशिक्षण शिबीर वरवंड कॅम्प सिनियर अंडर ऑफिसर. (२३ ऑक्टो. ते ३१ ऑक्टो १९९१) |
| ४. श्री बाळासाहेब सोमनाथ माळशिकारे, अंडर ऑफिसर | वार्षिक प्रशिक्षण शिबीर वरवंड ड्रिल कॉम्पिटिशन अंडर ऑफिसर. |
| ५. श्री लतिफ रशिद तांबोळी, श्री. राजेंद्र भानुदास वाबळे श्री प्रभंजन बाबुराव माने श्री संग्राम ज्ञानदेव शिंदे | वार्षिक प्रशिक्षण शिबीर, वरवंड, आंतरमहाविद्यालय नेमबाजी स्पर्धेत सहभाग प्रथम क्रमांक |
| ६. श्री दत्तात्रय तुकाराम जाधव कॅडेट | वार्षिक प्रशिक्षण शिबीर, वरवंड वादविवाद स्पर्धा दुसरा क्रमांक. |
| ७. श्री मनोहर विष्णू बंडगर कार्पोरल | -शिवाजी ट्रेकिंग कॅम्प - मार्गासनी (महाराष्ट्र) ९ डिसेंबर ते २२ डिसेंबर १९९१. |
| ८. श्री मच्छिंद्र भानुदास कदम, अंडर ऑफिसर | १. दिघी, पुणे आर.डी.कॅम्पची निवड. २९ ऑक्टो. ते १० नोव्हें. १९९१. |
| ९. श्री दत्तात्रय विठ्ठल खलाटे, कॅडेट | २. प्री. आर.डी.कॅम्प, दिघी, पुणे १९ डिसेंबर ९१ ते २ जानेवारी १९९२. ३. आर.डी.कॅम्प, दिल्ली ४ जानेवारी ते ३१ जानेवारी १९९२. ४. पोस्ट आर.डी.कॅम्प, मुंबई ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी १९९२. |
| (क) सर्टिफिकेट निकाल | १. "बी" सर्टिफिकेट परीक्षेत २४ छात्रांपैकी २२ उत्तीर्ण २. "सी" सर्टिफिकेट परीक्षेत ६ छात्रांपैकी ३ उत्तीर्ण. |

कॅप्टन एम.व्ही.गोडसे
प्रमुख, राष्ट्रीय छात्र सेना.

## राष्ट्रीय प्रौढ शिक्षण

महाविद्यालयातर्फे शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजनेअंतर्गत पुढील विविध कार्यक्रमाचे आयोजन केले.

**कार्यात्मक साक्षरतेचा सामुहिक कार्यक्रम :-** या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेतील ८० विद्यार्थी व इतर ५० विद्यार्थी साक्षरता स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले होते. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थी एका प्रौढास साक्षर करीत असतो. त्याकरिता साक्षरता स्वयंसेवकाचे प्रशिक्षण शिबीर दि. ३०/८/९१ रोजी आयोजित केले होते. दि. ८ सप्टेंबर १९९१ रोजी जागतिक साक्षरता दिनानिमित्त बारामती ते कण्हेरी साक्षरता दिंडी सायकल वरून आयोजित केली. साक्षरता दिंडीमध्ये घोषणा - बॅनर्स पत्रके करण्यात आली होती. शिवाय कण्हेरी येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण कार्यक्रम पार पाडण्यात आला. प्रौढ संप्रेरण शिबीर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी स्वयंसेवकांच्या केंद्राना भेटी देण्यात आल्या आहेत.

**साक्षरता अभियान कार्यक्रम -साक्षरता मंच :** सन १९९१-९२ वर्षात संपूर्ण पुणे जिल्हा साक्षर करण्याचा संकल्प शासनाने सोडला आहे. त्याकरिता 'पुणे' जिल्हा साक्षरता मंच' स्थापन करण्यात आला आहे. जिल्हा साक्षरता मंचाचे मा. डॉ. श्रीधर गुप्ते, कुलगुरु, पुणे विद्यापीठ हे अध्यक्ष असून मा.श्री.निवास पाटील, जिल्हाधिकारी व श्री. राजीव मुख्याधिकारी, जिल्हापरिषद पुणे हे दोघे उपाध्यक्ष आहे. बारामती तालुक्यात साक्षरता मंचाचे कार्य सुरू असून तालुका साक्षरता मंचाचे मा. पद्मश्री आप्पासाहेब पवार हे अध्यक्ष म्हणून व मा. प्राचार्य डॉ. जे.के.गोधा एक उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत.

सदर कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील ११ वी वर्गाचे सर्व ५०० विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून काम करीत आहेत. या सर्व विद्यार्थी स्वयंसेवकाना प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिवाय बारामती तालुक्यातील अनेक गावात प्रशिक्षणासाठी विद्यार्थी गेले आहेत.

स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यक्रमाची पाहणी करण्याकरिता तालुका साक्षरता अभियान कार्यक्रम ३०/११/९१ रोजी महाविद्यालय आयोजित केला. या कार्यक्रमात तालुक्यातून २००० लोक सहभागी झाले होते. या कार्यक्रमास मा. पद्मश्री आप्पासाहेब पवार, मा. श्री. निवास पाटील जिल्हाधिकारी, तालुक्याचे सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी भेट दिली. या कार्यक्रमात स्वयंसेवकांनी साक्षरता गाणी, भारुड, कलाजथा, पथनाट्य सादर करण्यात आले.

लॉंचिंग कार्यक्रम :- तालुका साक्षरता अभियानतर्फे दि. ९/१२/९१ रोजी लॉंचिंग कार्यक्रम बारामती शहरात आयोजित केला. त्यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवकांनी पथनाट्य, भारुड, साक्षरता गाणी सादर केली. पुणे जिल्हा साक्षरता अभियान कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला आहे.

प्रा.ए.एस.पंढरी
प्रमुख, प्रौढ शिक्षण विभाग

## शाळा महाविद्यालय समूह योजना

**आयोजित कार्यक्रम**

व्याख्याने :- १) कर्मवीर विद्यालय, सांगवी - 'व्यवसाय मार्गदर्शन' - प्रा. ए.एस.पंढरी

२) नवमहाराष्ट्र महाविद्यालय, पणदरे - -इयत्ता १० वी वर्गासाठी इंग्रजी - प्रा. कु. एम्.डी. वैद्य - प्रा.कु.आर. के. सुर्वे

३) मिशन हायस्कूल, बारामती. इ. १० वी जीवशास्त्र विषयावर - प्रा. डॉ.डी.के.मगदूम.

चर्चासत्र :- एस.एस.एम. हायस्कूल, माळेगाव येथे इंग्रजी शिक्षकांना मार्गदर्शन चर्चासत्र आयोजन व विषयतज्ज्ञ म्हणून महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील सर्व प्राध्यापक होते.

प्रात्यक्षिके :- १) राधेश्याम टेक्निकल हायस्कूल, बारामती - विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरची माहिती दिली, व प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आली. - प्रा. एन्.जे.सुबंध, प्रा.पी.सी.पिंगळे.

२) महाविद्यालयामध्ये इंग्रजी शिक्षकांकरिता भाषाशास्त्र प्रयोगशाळेत (लॅंग्वेज लॅब्रोटरी) भाषाशास्त्र विषयावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दाखविले. - प्रा. के. एस. अय्यर, प्रा. पी.डी. वडगांवकर.

प्रा.एम.डी.भगत
प्रमुख,
शाळा - महाविद्यालय समूह योजना

## ग्रंथालय

"ग्रंथालय ज्ञानवृद्धीचे प्रभावी साधन आहे म्हणूनच ग्रंथालय हे कोणत्याही शिक्षण संस्थेचे भूषण असते. आमचे ग्रंथालय ही ग्रामीण भागातील महाविद्यालयाच्या तुलनेत सर्वात अग्रेसर आहे हे आम्हास निश्चितच भूषणावह आहे."

एकूण ग्रंथ संख्या ३१/३/९१ ७५२४६: किंमत रु. १८,१४,८०७-७१

अखेर १९९१-९२ या वर्षातील नवीन ग्रंथांची भर वरिष्ठ महाविद्यालय १०५८ किंमत रु. ४३,१८९-६०

| | | |
|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | ३४२ | किंमत रु. ९,५०४-२० |

ग्रंथालयात खालीलप्रमाणे नियतकालिके खरेदी केलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| एकूण नियतकालिके भेटीदाखलसह | १६७ | किंमत रु. १२,९६३-०० |
| एकूण वर्तमानपत्रे | १२ | किंमत रु. ७,२७२-००२ |

ग्रंथपेढी - ग्रंथपेढीतून १९९१-९२ या वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना ग्रंथाचे वाटप केले.

| | |
|---|---|
| १. वरिष्ठ महाविद्यालय | २०० |
| २. कनिष्ठ महाविद्यालय | २९५ |
| | ४९५ |

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात खालीलप्रमाणे विविध स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे वाचनसाहित्य उपलब्ध आहे.

एम.पी.एस.सी., यु.पी.एस.पी., सी.ए., आय.सी.डब्ल्यु.ए., आय.आय.टी., डी.टी.एल., डी.बी.एम.,एम.बी.ए., जर्मन मॅनेजमेंट, मार्केटिंग, कॉस्टिंग, मेडिकल, इंजिनियरिंग इत्यादी स्पर्धा परीक्षा तसेच व्यवसाय मार्गदर्शन, औद्योगिक क्षेत्रातील विविध लहान आणि मोठे कारखाने स्थापण्यासाठी आवश्यक माहिती, वेल्डिंग, फिटिंग, टर्निंग यासारख्या तंत्रज्ञान शाखेचे आवश्यक ग्रंथ, पाकशास्त्र, योगाभ्यास, आरोग्य व आहार.

ग्रंथालयाच्या सूचना फलकावर विविध स्पर्धा परीक्षा, नोकरी वगैरे संबंधींच्या जाहिराती वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रात्रीच्या प्रशस्त अभ्यासिकेची सोय ग्रंथालयात करण्यात आली आहे.

ग्रंथांची देणगी खालीलप्रमाणे मान्यवर व्यक्ती व संस्थांनी भेटीदाखल ग्रंथ देऊन ग्रंथालयात मौलिक भर घातली आहे.

व्यक्ती - मा. श्रीमान माणिकलाल तु.शहा., प्रा.एस.जी.बोंद्रे, श्री. के.आय.विभूते मानद संचालक, विद्यार्थी कल्याण, पुणे विद्यापीठ, प्रा. श्री.ग.द.दातीर.

**संस्था :** टॅक्सेशन पब्लिकेशन, नवी दिल्ली, शेठ पब्लिशर्स प्रा. लि. मुंबई टाया मॅकग्रॉहील पब्लिशिंग कं.लि. दिल्ली.

**प्रा.एस.एन्.पाटील**
ग्रंथपाल

✪✪✪✪

## कविवर्य मोरोपंत वाद-वक्तृत्व स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे दि. ४ व ५ ऑक्टोबर १९९१ रोजी कविवर्य मोरोपंत वाद-वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

अ. **वाद स्पर्धेचा विषय** -'भारताची प्रतिष्ठा धुळीला मिळविण्यात राज्यकर्तेच जबाबदार आहेत'' हा विषय होता. वाद स्पर्धेत १७ महाविद्यालयाच्या ३४ विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धकांनी सहभाग घेतला.

ब. **वक्तृत्व स्पर्धेचे विषय** १) मराठी आख्यान कविता आणि मोरोपंत २) मोरोपंताच्या काव्यात दिसून येणारी त्यांची व्यक्ति वैशिष्ट्ये ३) मादक पदार्थाच्या विळख्यातील आजचा युवक ४) विवाह असे हवेत, असे नकोत ५) रुपया म्हणतो मला पैसा म्हणा ६) शिक्षणाची शोकांतिका ७) दहशतवादाचा मुकाबला.

वक्तृत्व स्पर्धेत ३८ विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धकांनी सहभाग घेतला.

क. **उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन** केले त्यात २१ विद्यार्थी -विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. वाद वक्तृत्व स्पर्धाचे उद्घाटन मा. श्री. चंद्रराव तावरे, चेअरमन, माळेगाव सहकारी साखर कारखाना, माळेगाव यांच्या शुभहस्ते व मा. श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष बारामती नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

**वाद वक्तृत्व स्पर्धाचे उद्घाटन** मा. श्री. चंद्रराव तावरे चेअरमन, माळेगाव सहकारी साखर कारखाना, माळेगाव ह्यांच्या शुभहस्ते व मा. श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

**वाद-स्पर्धेचे पारितोषिक वितरण** मा.श्री. प्रतापराव बोर्डे कार्यकारणी सदस्य, पुणे विद्यापीठ यांच्या शुभहस्ते झाले. वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण मा. प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम, सहसचिव, भारती विद्यापीठ, पुणे यांच्या शुभहस्ते झाले. मा. आमदार विजयराव मोरे, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्राचार्य के.डी.जाधव, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे यांच्या विशेष सन्माननीय उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.



पारितोषिक

१) **वक्तृत्व स्पर्धा** - कु. मनीषा येडूरकर, चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालय, सांगली या विद्यार्थिनी - स्पर्धकाला वक्तृत्वात प्रथम क्रमांक मिळाला व वैयक्तिक चांदीची फिरती ढाल मिळाली.

२) **वाद स्पर्धा** - कु. प्रज्ञा केळकर व कु. कलिका कोकाटे, बालमुकुंद संस्कृत महाविद्यालय, पुणे या स्पर्धकांनी वाद स्पर्धेची फिरती सांघिक चांदीची ढाल मिळविली. श्री. पुरुषोत्तम काळे, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे या स्पर्धकाला गुणानुक्रम सर्व प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

३) **उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा** - या स्पर्धेत अनुक्रमे श्री. पुरुषोत्तम काळे, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे, श्री. साकेत बापट, एस.पी.कॉलेज, पुणे व कु. प्रज्ञा केळकर, बालमुकुंद संस्कृत महाविद्यालय, पुणे यांनी बक्षिसे मिळवली.

**आमच्या महाविद्यालयीन विद्यार्थी स्पर्धकांनी संपादन केलेली पारितोपिके**

१) कु. प्रगती भापकर व कु. नीलिमा महाजन या विद्यार्थिनी स्पर्धकांनी सातारा येथील वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिके संपादन केली.

२) कु. प्रगती भापकर या विद्यार्थिनी स्पर्धकाने वक्तृत्व स्पर्धेत ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा जि. अहमदनगर येथे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले.

३) कु. मनीषा मिसाळ या विद्यार्थिनी स्पर्धकाने वाद स्पर्धेत भोर महाविद्यालय भोर जि. पुणे येथे उत्तेजनार्थ पारितोषिक संपादन केले.

**प्रा.डॉ.एस.बी.खरोसेकर**
कार्याध्यक्ष

## सांस्कृतिक मंडळ

सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक विभागातर्फे खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पुणे येथे सिंबॉयोसिस कॉलेजमध्ये झालेल्या नाट्यवाचन स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाचा सहभाग होता.

दि. २७ सप्टेंबर १९९१ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या जयंती समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले, माजी कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ हे उपस्थित होते.

लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त 'काव्यसुमन श्रध्दांजली' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कु. भारती सुर्वे यांचे मेंदी रंगविणे या विषयावर सप्रयोग व्याख्यान फक्त मुलींच्यासाठी आयोजित करण्यात आले होते.

प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांचा काव्यवाचनाचा बहारदार कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला.

प्रा. डॉ. वि.भा. देशपांडे यांचे 'नाटक कसे पहावे' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

महाविद्यालयाच्या नाट्य संघाने भोर येथे झालेल्या नाट्यस्पर्धेत दुसऱ्या क्रमाकांचे पारितोषिक मिळविलेले आहे.

वर्षभरात काव्यवाचन, नाट्यवाचन, लावणी - गवळण, भारुड गायन, प्रसंग अभिकल्प दर्शन, स्वामी विवेकानंदाच्या जयंतीनिमित्त व्याख्यान, प्रतिज्ञा वाचन इत्यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

**प्रा. डॉ.प्र.द.वावरे**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

## महाविद्यालय परिसर व वनस्पती शास्त्रीय उद्यान विकास समिती

महाविद्यालयाचा परिसर विकसित करण्यासाठी व नैसर्गिक दृष्टीने सुशोभित करण्यासाठी विविध प्रकारच्या सुयोग्य, शोभेच्या वनस्पतींची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत वनराई प्रकल्प कार्यान्वित केला जात आहे. त्यात विविध जातीच्या वनस्पती व साग वनस्पतीचे संगोपन, संवर्धन केले जात आहे.

वनस्पतिशास्त्र विषयाच्या अभ्यासाकरिता लागणाऱ्या वनस्पतीचे संगोपन, संवर्धन केले जाते. त्याचबरोबर विविध औषधी वनस्पतींची लागवड करुन अद्यावत असे वनस्पति-शास्त्रीय उद्यान (बोटॅनिकल गार्डन) निर्मितीस प्रयत्नशील आहोत.

उद्यानविद्या व फलोद्यान विषयांतर्गत विविध फळ झाडांची व शोभेच्या वनस्पतीची लागवड व प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम अंमलात आणला जात आहे.

**प्रा.डॉ.एस.एस.देवकुळे**
प्रमुख

## डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी चर्चासत्र समिती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर - राजकीय विचार व नेतृत्व' या विषयावर दि. २८ ते ३० नोव्हेंबर १९९१ या काळात विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्लीच्या वित्तीय साहाय्यातून चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चा सत्राचे उद्घाटन मा. श्री. बाळासाहेब भारटे, माजी सभापती, विधान सभा महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभ हस्ते व मा. आमदार विजयराव मोरे, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झाले. विषय तज्ज्ञ व सूत्र संचालन प्रा. डॉ. एम.डी.नलावडे, कुलसचिव पुणे विद्यापीठ, डॉ. व्ही.के.क्षिरे राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. राजेंद्र व्होरा, प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ डॉ. अशोक चौसाळकर, प्रपाठक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केले. आमच्या महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील ४० तज्ज्ञ प्राध्यापक चर्चा सत्रात सक्रिय सहभागी झाले. त्यांनी २० शोध निबंध सादर केले. विशेष सन्मानीय उपस्थिती, सहभागी व शोध निबंध सादर करण्यात डॉ. व. मा. कोठारी, श्री. धो. आ.सातव, डॉ. सौ. निलम गोऱ्हे, सौ. उत्तरा शास्त्री, प्रा. डॉ. सुहास पळशीकर, डॉ. उत्तमराव भोईटे, श्री. विलास वाघ, श्री किरण गुजर, सौ. अलकाताई मोरे, डॉ. सुरेंद्र जोंधळे व श्री. पी. आर. काकडे इत्यादींचा सहभाग महत्त्वाचा होता.

श्री किरण गुजर : माजी विद्यार्थी व नगरसेवक, श्री. रमाणिक मोता, श्री. अमर साबळे संपादक केकावली साप्ताहिक बारामती यांच्याकडून चर्चा सत्र यशस्वी करण्याकरिता विशेष सहकार्य व सक्रिय साहाय्य लाभले.

मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले, माजी कुलगुरु मराठवाडा विद्यापीठ, प्रमुख पाहुणे व मा. प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचे यशस्वीपणे समारोप झाला.

**प्रा. विलास काकडे**
संयोजक,
डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी चर्चासत्र

## विज्ञान प्रदर्शन

प्रजासत्ताक दिनानिमित्त विज्ञानातील शोध-बोधाची प्रचीती सर्वसामान्यांनाही प्रत्यक्ष करून देण्याच्या उद्देशाने दिनाक २५ ते२७ जानेवारी १९९२ या काळात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मा. पद्मश्री आप्पासाहेब पवार, अध्यक्ष बारामती कृषि विकास प्रतिष्ठान यांच्या शुभहस्ते व मा. श्रीमानशेठ जंबुकुमार शहा अध्यक्ष अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

विज्ञान प्रदर्शनात महाविद्यालयातील विज्ञानशाखेतील सर्व विभागांनी त्याचप्रमाणे बारामती शहर व परिसरातील अनेक शाळा व हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग घेतला. प्रदर्शनात पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, संख्याशास्त्र, संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शेती, फलोद्यान, बेकरी अँड कन्फेक्शनरी इत्यादि. विषयांतर्गत विज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण मॉडेल्स्, पोस्टर्स, प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. विशेषत: मानवी उत्क्रांती, भिन्न वयाची अर्भके (गर्भ), उत्सर्जन. अवयवांचे नमुने, मानवी शरीरातील रक्ताभिसरण नमुना, सजीव विषरी-बिनविषारी सर्प, अंधश्रध्दा व वैज्ञानिक तत्त्वे, अल्कोहोल प्लॅन्ट, औषधी वनस्पती, खत प्रकल्प, गूळ तयार करणे, बोनसाय प्लॅन्ट, डी.एन.ए. प्लॅन्ट मॉडेल, पूरनियंत्रण घंटा, स्प्रिंकल पाणी पुरवठा, संगणक व संख्याशास्त्राची उपयुक्तता, उपग्रह संदेशवहन, अग्निबाण प्रक्षेपक, पाण्याच्या लाटेवरून वीज निर्मिती, निकामी ट्यूबचा पुन्हा उपयोग करणे, सूक्ष्मजीवाणूंची माहिती, टू स्ट्रोक-फोर स्ट्रोक ऑईल इंजिन्स, बेकरी खाद्यपदार्थ-केक-बिस्कीट-कटलेट-खारी, ब्रेड तयार करणे, अशा अनेक विविध विषयांचे प्रयोग व माहिती प्रदर्शनाद्वारे देण्यात आली.

विज्ञान प्रदर्शनास शाळा, हायस्कूल, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, जिज्ञासू नागरिक, व इतरांनी मोठ्या संख्येने भेट देऊन उत्तम प्रतिसाद दिला.

प्रा. व्ही. ए. वकील,
अध्यक्ष, विज्ञान प्रदर्शन समिती.

## वाणिज्य प्रदर्शन

महाविद्यालयाच्या वाणिज्य विज्ञानशाखेच्या वतीने व बारामती शहर व परिसरातील बँका, विमा कंपन्या, सहकारी संस्था, औद्योगिक वसाहती उद्योग यांच्या सहकार्याने प्रथमच वाणिज्य प्रदर्शन दि. २५ ते २७ जानेवारी १९९२ या काळात आयोजित करण्यात आले. वाणिज्य प्रदर्शनाचे उद्घाटन मा. श्री. चंद्रराव तावरे, चेअरमन, माळेगाव सहकारी साखर कारखाना, शिवनगर (माळेगांव) यांच्या शुभहस्ते व मा. श्रीमानशेठ जंबुकुमार शहा, अध्यक्ष, अनेकांत एज्युकेशन सोसायटी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

वाणिज्य प्रदर्शनात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली व्यापार-उद्योगातील उपयुक्त, माहितीपूर्ण मॉडेल्स, विविध स्वरुपाची कागदपत्रे साहित्य, तक्ते, उद्योजकता विकास माहिती पत्रके यांची आकर्षकपणे मांडणी केली होती. व्यवस्थापन, बँकिंग, आयात-निर्यात, व्यापार, वाहतूक-दळणवळण, साठवण इ. संस्थांचा परिचय, महत्त्व दर्शविणारे माहितीपत्रके-नमुने नामवंत कर्तृत्वान् उद्योजक कंपन्याचा परिचय इ. नमुनेदार विविध वाणिज्य क्षेत्रातील विषयांवर उपयुक्त माहिती उपलब्ध करून वाणिज्य प्रदर्शन परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. वाणिज्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात विद्यार्थी वर्गांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिवाय बारामती शहरातील रुपी को-ऑपरेटिव्ह बँक, युनायटेड वेस्टर्न बँक, एस.टी.महामंडळ, एम.आय.डी.सी., एल.आय.सी., न्यू.इंडिया इन्शुरन्स यांनीही सक्रिय भाग घेऊन सहकार्य केले.



प्रदर्शनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना उत्तेजन, प्रेरणा देण्याकरिता या प्रदर्शनातील गुऱ्हाळ मॉडेल, राज्यवखार महामंडळ व लोह पोलाद उद्योग मॉडेल यांना पारितोषिके देण्यात आली. वाणिज्य प्रदर्शनास बारामती मधील शाळा हायस्कूल महाविद्यालयातील विद्यार्थी व बारामती शहर व परिसरातील नागरिकांनीही भेट देऊन प्रतिसाद दिला.

प्रा.ए.व्ही. इंगळे, प्रमुख संयोजक
वाणिज्य प्रदर्शन

## हिंदी विभाग :

**हिंदी दिवस :**

१४ सप्टेंबर ९१ रोजी 'हिंदी दिवसानिमित्त डॉ. सौ. अंशुमती दुनाखे : सहायक निर्देशक, हिंदी शिक्षण योजना : गृह मंत्रालय, पुणे यांचे व्याख्यान आयोजिले होते.

त्याच दिवशी बारामतीमधील सरकारी कार्यालये, बँका, डाक कार्यालय इत्यादी विभागांच्या प्रमुखांची एक बैठक कॉलेजात झाली. याप्रसंगी डॉ. सौ. दुनाखे यांनी हिंदी शि[illegible]योजना व त्यामार्फत होणाऱ्या परीक्षा, अभ्यासक्रम याबाबत माहिती दिली.

**चर्चासत्र :**

२१ मार्च १९९२ रोजी "नयी कविता के संदर्भ में रस, वक्रोक्ति एवं ध्वनि-सिद्धांत की सार्थकता" या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र आयोजिले होते. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले व पुणे विद्यापीठातील हिंदी विभागातील प्रपाठक डॉ. रामजी तिवारी यांनी समारोप केला. या चर्चासत्रात डॉ. राजेंद्र शहा, डॉ. ह. श्री. साने, प्रा. कंडारकर, प्रा. बी. एस्. माने, प्रा. सौ. अनुपमा प्रभुणे यांनी आपली टिपणे सादर केली व त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत डॉ. प्रथमवीर, डॉ. सुरेश जैन, डॉ. पद्मजा घोरपडे, प्रा. ज. मो. कोठारी, प्रा. साळुंके, डॉ. सुर्वे यांनी सहभाग घेतला. याशिवाय प्रा. माने (सोमेश्वर), प्रा. मिसाळ (कळंब) प्रा. जमीर शेख (भोर), प्रा. वाणी (पुणे) प्रा. डी. एस्. शहा व प्रा. लोंढे (मराठी विभाग) आणि स्थानिक प्रशालांमधील हिंदी विषय शिक्षकही या चर्चासत्रात उपस्थित होते.

प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे, प्रमुख : हिंदी विभाग

## अर्थशास्त्र विभाग :

अर्थशास्त्र विभागातर्फे दि. २९.३.१९९२ रोजी एक दिवसाचे 'कृषी-वित्त-पुरवठा समस्या व उपाय' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. बारामती परिसरातील प्रगतीशील शेतकरी, बँकांचे अधिकारी वर्ग व प्राध्यापक यांनी सदर चर्चासत्रात सहभाग घेतला. चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. डी. पी. आपटे यांनी केले. अध्यक्षस्थानी मा. एस्. एस्. हिरेमठ हे होते. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

प्रा. एस्. जी. बोंद्रे, प्रमुख : अर्थशास्त्र विभाग

## DEPARTMENT OF ENGLISH REPORT

The department undertook the following activities during the academic year 1991-92 :

**Post-graduate section :** In addition to the college staff we had visiting professors from the University department and affiliated colleges who delivered lectures to the M.A.English class. Professor Dr. Prashant K. Sinha and Dr. S. B. Gokhale, Reader in English Language, from the University department of English, Principal B. N. Kulkarni, Dr. A. P. Dani, Head, Department of English, Fergusson College, Pune and Prof. V. M. Madge, Head, Department of English, Waghire College, Saswad, were the visiting teachers.

**Certificate Course in English :** We are happy to record that our student Mr. Ranjeet Fattesing Jagtap stood First in the University at the Examination held in April 1991. This year 25 students have appeared at the Examination held in April 1992.

**English Literary Association :** The activities of the Association were inaugurated by Professor Dr. Prashant K. Sinha of the Dept. of English, University of Poona in September, 1991. The closing function was held on 30th March, 1992. Dr. A. P. Dani, Head, Department of English Fergusson College, Pune was the Guest of Honour. He gave away prizes to the winners at the various competitions such as Handwriting, Racitation, Speech-making, Essary-writing, poem writing and paper reading were conducted throughout the year. Two special issues (out of five) of the Wall-Paper namely on George Bernard Shaw and Tennessee Williams were brought this year.

**Bemedial Course in English for weaker sections of society :** This Course was conducted throughout the year ending with Annual Examination held in March 1992. Students who successfully completed the Course were awarded certificates, a gramme-r-book and a dictionary each.

**Prof. K. S. Iyar**
Head of English Department

# COSIP

College Science Improvement Scheme (COSIP) was implemented in the college for three years from 1/12/1987to 30/11/1990. A Grant of Rs. 3,00,000/- was sanctioned by the University Grants Commission, Delhi.

Following activities were carried out in the last three years.

**1. Visiting Lecturers-**

Series of guest lectures was arranged in different subjects. Prominent teachers from Poona, Shivaji, Bombay and Marathwada Unviersities delivered lectures.

**2. Seminars/Workshops -**

Seminars/Workshops were organised in different subjects, as under :

| Subject | Topic of the Seminar/Workshop | No. Of Participants |
|---|---|---|
| 1) Physics | Material Science | 35 |
| 2) Chemistry | Electrochemical Techniques of Analysis | 35 |
| 3) Botany | Applied Botany | 46 |
| 4) Zoology | Molecular Biology and Genetics | 24 |
| 5) Mathematics | Applcation of modern Algebra | 14 |
| 6) Statistics | Job Opportunities in Statistics | 17 |
| 7) Geography | 1) Environmental Science 2) Rural Settlement | 12 |

All Seminars/Workshops were most successful.

**3. Project Work-**

Following Projects were carried out by the departments.

**Physics & Electronics -**

1) Digital laboratory Kit.
2) Opamp Kit.
3) Timer 555 Kit.
4) Frequency meter
5) Linear Scale ohm-meter
6) Colllege Time Table - Automatic bell.
7) Timer (for National Anthem).
8) Digital Clock.
9) Amplifier (20 wt.)
10) Electronic dimmer.
11) Intercom.

Some of the projects were carried out by T.Y.B.SC. Students.

**Chemistry-**

1) Soil & Water analysis.
2) Practical Theory Integration.
3) Separation & Identification of amino-acids.
4) Analysis of iron, chromium and manganese using colorimeter.
5) Extraction of caffine from tea-leaves.
6) Qualitative analysis of organic mixtures containing three components, using ether.

**Botany**

1) Angiospermic flora of Baramati area.
2) Medical Plants of Baramati area.
3) Study of Aerospora from Baramati area.

**Zoology**

1) Study of different types of insect pests on common crops.
2) Study of Blood group and its importance.
3) Study of sugar percentage in blood & Urine.
4) Biology of Cestode parasite of edible vertibrate animals.

**4. Equipments and Audio-Visual Aid-**

Some equipment and audio-visual aods were purchased from the grant to develop the departments.

**5. Study Tours -**

Chemistry department organised a study tour to Goa where students visited some chemical industries. Botany department organised several one-day tours to local and distant places, tours to malvara, Mahabaleshwar, Bhimashankar etc, for the purpose of collection. Zoology department also organised a tour to Goa to collect marine animals.

**Prof. S.R.Nawathey**
*Chief Cordinator*
*COSIP*



हार्दिक शुभेच्छा

नोंदणी क्र. पी.एन्.पी./बी.एम्.टी./बी.एन्.के. १०१० सन १९८३ — स्थापना दि. ४.८.८३

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, बारामती, जि. पुणे**

फोन २४०५

प्रा. वी. बी. पाटील, M.Sc., अध्यक्ष
प्रा. आर्. के. नाळे, M.Sc., सचिव
श्री. डी. एल्. पारख, M.A., खजिनदार

हार्दिक शुभेच्छा

स्थापना : १९८३
सभासद संख्या ३५४०
नोंदणी क्रमांक PNS/BMT/CONS/1962/83

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्यादित**

बारामती ४१३ १०२ जि. पुणे

विद्यार्थ्यांसाठी खास सवलतीच्या दराने स्टेशनरी उपलब्ध केली जाईल.

प्रा. ए. बी. भगाटे, सचिव
प्रा. पी. बी. इंगवले, अध्यक्ष

हार्दिक शुभेच्छा !

**अनेकान्त मुद्रणालय**

महाविद्यालयाच्या आवारातच सुबक व मोहक छपाईची सेवा उपलब्ध आहे.
चौकशी महाविद्यालयाच्या कार्यालयात करावी.

अनेकान्त या वार्षिकांकास हार्दिक शुभेच्छा :

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती, जि. पुणे

### तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे
(वरिष्ठ आणि कनिष्ठ)

कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखा
कला आणि वाणिज्य विद्याशास्त्रात पदव्युत्तर शिक्षणाची सोय

व्यावसायिक अभ्यासक्रम

- बेकरी व कन्फेक्शनरी, हॉर्टिकल्चर, ऑटो इंजिनिअरिंग
- मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप
- डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ
- इलेक्ट्रिक वायरमन, टु व्हिलर ऑटो मेकॅनिक
- सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओ सर्व्हिसिंग
- व्होकेशनल कोर्सेस
- बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स
- सर्टिफिकेट कोर्सेस
- कंपोझिंग,प्रिंटिंग ॲण्ड बाईंडिंग, क्राफ्टसमनशिप कोर्स इन बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी
- सर्टिफिकेट कोर्स इन टेलिव्हिजन सव्हिसिंग

### जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
(वरिष्ठ आणि कनिष्ठ)

कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखा
कला विद्याशाखेत पदव्युत्तर शिक्षणाची सोय

### इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च, बारामती, जि. पुणे

- डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंट
- डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट
- मास्टर्स डिग्री इन पर्सोनेल मॅनेजमेंट

### औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बारामती, जि. पुणे
जून १९९२ पासून सुरु करण्यात येत आहे

- वेल्डिंग, इलेक्ट्रिशियन, कारपेंटरी

### विज्ञान कार्यशाळा, बारामती, जि. पुणे
### मुलांचे वसतिगृह, बारामती, जि. पुणे
### अनेकान्त मुद्रणालय, बारामती, जि. पुणे